
पुणे, किशोर- वर्ष ५५, अंक ४ था, एप्रिल २०२६ (मासिक) - किंमत रु. ७/- पृष्ठे ५२.
Pune, Kishor- Vol. 55, Issue- 4, April 2026 (Monthly) - Price Rs. 7/- Pages- 52.

# किशोर

एप्रिल २०२६







# भीमराया



■ मनोहर आंधळे

पुत्र व्हावा ऐसा
जैसा भीमराव
रामजींचे नाव
उजळले

वर्गाच्या बाहेर
ज्ञान घेता येते
दूरदृष्टी देते
परिस्थिती!

आंबवडेकर
गुरुजी पाठीशी
तेव्हा शिक्षणाशी
मैत्री झाली

व्यवस्था हरली
समता जिंकली
भीमाने हो केली
अशी मात!

गुरुस्थानी बुद्ध
कबीर नि फुले
सार्थकी लागले
आयुष्य हे

सयाजी राजे ते
मदतीला आले
परदेशी धाडले
शिक्षणाला

बुद्धीची चुणूक
प्रज्ञासूर्य झाली
तेजाने व्यापली
मायभू ही

स्वातंत्र्यात मिळो
समता, बंधुता
आणि विषमता
मिटो म्हणे

संपर्क : ९४२१५१२५७०

भारत देशाची
घटना लिहिली
पामरांना दिली
दिव्य शक्ती!

कायद्याची सूत्रे
बाबासाहेबांकडे
वाजले चौघडे
देशभर

भारतरत्न हा
लाभला सन्मान
किती तू महान
भीमराया!



**किशोर** एप्रिल २०२६, वर्ष ५५ वे, अंक ४ था, चैत्र- वैशाख, शके १९४७-४८

- संपादक :
  अनुराधा ओक, संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे
- प्रकाशक : हेमंत बाबर
  प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई
- निर्मिती अधिकारी : सागर भापकर
- अक्षरजुळणी : किशोर विभाग
- कार्यकारी संपादक :
  किरण केंद्रे
- वितरण व्यवस्थापक
  जी. आर. पानसरे
- *मुखपृष्ठ : संजय साठे*
  *संपर्क : ८६६८५२०८१८*
- *चित्रांकन : गिरीश सहस्रबुद्धे, रेश्मा बर्वे, घनश्याम देशमुख, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे, धनश्री केळकर, लोकेश कुलकर्णी, लक्ष्मीकांत काळे, कार्टुनिस्ट इरा, माईंडईट संवाद*

# अंतरंग


- भीमराया ........ *मनोहर आंधळे* ........ ०२
- डॉ. आंबेडकर गुरुजींच्या आठवणी ........ *अवधूत डोंगरे* ........ ०६
- अद्‌भुत गोष्टी मंडळ ........ *दासू वैद्य* ........ १२
- चला चित्र रंगवूया...! ........ *रेश्मा बर्वे* ........ १७
- चळवळ्या चिंटू ........ *डॉ. नंदू मुलमुले* ........ १८
- आज काय झालं ? ........ *कार्टुनिस्ट इरा* ........ २१
- संत निर्मळा ........ *डॉ. संगीता बर्वे* ........ २२
- एक तुकडा ........ *सुधीर पाठक* ........ २५

**अभिजात मराठी विभाग**
- नवे शब्द, मित्र होऊन वाट पाहतात! ........ *प्रवीण दवणे* ........ २६
- शब्दांचा क्रम जुळवा बरं! ........ *डॉ. नीलिमा गुंडी* ........ २८
- गंमत शब्दांची ........ *प्रा. विश्वास वसेकर* ........ ३०
- प्रश्नमंजुषा ........ *डॉ. सुधीर मोरे* ........ ३१
- महात्मा जोतीराव फुले ........ *मोगल जाधव* ........ ३२
- गुण आणि मार्क ........ *विनायक ढवळे* ........ ३५
- कुतूहल. ........ *योगेश दराडे* ........ ३८

**बालविभाग**
- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : जादूगाराची सुटका ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- बाळ ........ *मधुमती वऱ्हाडपांडे* ........ ४६

**ENGLISH SECTION**
- The Power of Reading ........ ***Sachin Chavan*** ........ ४७
- Bunty's Museum of Teddy Bears ........ ***Vidya Dengle*** ........ ४८
- Funny Puzzle ........ ***Ghanshyam Deshmukh*** ........ ५०


ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील (डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, **संपादकीय :** ०२०- २५७१६१०७ **वितरण व तक्रार :** ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# प्रिय किशोर

प्रिय किशोर,

'किशोर' हे विद्यार्थी, पालक व शिक्षकांसाठी उपयोगी पडणारे मासिक आहे. माझे विद्यार्थी दर महिन्याच्या सुरुवातीला किशोरचा अंक कधी येतो अशी वाट पाहतात कारण त्यामध्ये त्यांनी पाठवलेली चित्रे, कविता, कोडी काही प्रसिद्ध झाले का हे त्यांना पाहायचे असते. आजपर्यंत माझ्या अनेक विद्यार्थ्यांची चित्रे व कविता किशोरने प्रसिद्ध करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. त्यांच्या या सुप्त गुणांना वाव मिळाला आहे त्याबद्दल किशोरचे खूप-खूप आभार.

या मासिकातून विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन दोन्ही कौशल्ये विकसित होतात. इंग्रजी विभागही खूप छान आहे. एकंदरीत सर्व विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी आणि शिक्षकांसाठी हे मासिक खूप उपयोगी आहे.

धन्यवाद !

**श्री. विनोद मधुकर जावळे**
जि.प.केंद्र मराठी उच्च प्राथमिक शाळा,
कवठळ, ता. संग्रामपूर, जि. बुलडाणा.

प्रिय किशोर,

'किशोर' मासिक वाचून मला खूप आनंद झाला. मला मासिकामधून खूप माहिती मिळते. मला ती माहिती वाचून खूप खूप आनंद झाला. तुमचे किशोर मासिक खूप चांगले आहे. मला मोठा होऊन कलेक्टर बनायचं आहे ! मला झाडं आवडतात. मला खरेच तुमचे किशोर मासिक खूप आवडत आहे.

**कु. तनय जावेदा जिंदगी**
मु.पो.भातोडी(पा), ता.जि. छत्रपती संभाजीनगर ४१४२०१.



# परीक्षा : भीती नाही, तर प्रगतीची संधी..

किशोर मित्र- मैत्रिणींनो, परीक्षेची तयारी करताना केवळ पुस्तकी ज्ञान महत्त्वाचे नसते, तर मन शांत ठेवणे आणि एकाग्रता साधणेही तितकेच गरजेचे असते. याबाबत तुम्हांला दोन छान झेन कथा सांगणार आहे. या दोन्ही झेन कथा तुम्हांला परीक्षेच्या काळात नक्कीच मार्गदर्शक ठरतील. तुम्ही त्या शांतपणे काळजीपूर्वक वाचा. यातील पहिली कथा आहे रिकामे कप (The Empty Cup) नावाची.. ही कथा आपल्याला सांगते की, नवीन शिकण्यासाठी आधी मनातील भीती आणि जुने विचार बाहेर काढणे आवश्यक असते.

एक हुशार पण घाबरट असलेला विद्यार्थी एका झेन गुरूंकडे मार्गदर्शनासाठी गेला. तो सतत स्वतःला किती येते पण त्याला नेमकी परीक्षेची किती भीती वाटते याबद्दलच बोलत होता. गुरूंनी त्याला चहा दिला. ते त्याच्या कपात चहा ओतू लागले. कप भरला तरी ते थांबले नाहीत आणि चहा कपाबाहेर सांडू लागला. विद्यार्थी म्हणाला: "थांबा गुरुजी! कप भरला आहे, आता यात काहीच मावणार नाही. चहा वाया जातोय!" तेव्हा झेन गुरुजी म्हणाले ''अगदी या कपाप्रमाणेच, तूसुद्धा तुझ्या शंका, भीती आणि स्वतःच्या ज्ञानाच्या अहंकाराने भरलेला आहेस. जोपर्यंत तू तुझे मन रिकामे करत नाहीस, तोपर्यंत मी तुला परीक्षेसाठी नवीन काहीही शिकवू शकणार नाही.''

किशोर मित्र-मैत्रिणींनो, परीक्षेला जाताना 'मला काहीच येणार नाही' किंवा 'मला सगळं येतंय' या दोन्ही टोकाच्या भावना बाजूला ठेवा. तुमचे मन एका रिकाम्या कपासारखे मोकळे आणि ग्रहणक्षम ठेवा. अशीच अजून एक सुंदर गोष्ट आहे दगड आणि पाणी (The Stone and the Water) या नावाची. ही कथा 'स्थितप्रज्ञता' म्हणजे कठीण प्रसंगात शांत राहण्याबद्दल अतिशय उत्तम मार्गदर्शन करते. एक विद्यार्थी परीक्षेच्या दबावामुळे खूप अस्वस्थ होता. तो झेन गुरुजींकडे गेला आणि म्हणाला, ''बाहेरून खूप दडपण येत आहे, माझ्याकडून अभ्यास होत नाहीये.'' गुरुजी त्याला एका शांत तलावाकाठी घेऊन गेले. गुरुजी म्हणाले ''या तलावात एक मोठा दगड फेक.'' त्या विद्यार्थ्याने तलावात दगड फेकला, डुबुक असा आवाज झाला आणि तेथे लाटा निर्माण झाल्या. गुरुजी म्हणाले ''आता या लाटा शांत करण्याचा प्रयत्न कर.'' तेव्हा तो विद्यार्थी म्हणाला ''गुरुजी, मी जेवढा प्रयत्न करेन तेवढं पाणी जास्त हलणार. त्याला आपोआप शांत होऊ देणं हाच एक मार्ग आहे.'' गुरुजी म्हणाले ''अगदी बरोबर. तुझे मन म्हणजे हे पाणी आहे आणि परीक्षेचे दडपण म्हणजे तो दगड. तू जितका जास्त अस्वस्थ होशील, तितक्या विचारांच्या लाटा वाढतील. फक्त शांत बस. मन एकाग्र कर. तुला ताण देणारे, गोंधळात टाकणारे तुझे विचार स्वतःहून तळाला जातील आणि तुला तुझे ध्येय स्पष्ट दिसेल.''

किशोर मित्र मैत्रिणींनो, तुम्हांला जेव्हा परीक्षेची भीती वाटेल, तेव्हा दोन मिनिटे डोळे मिटून फक्त श्वासावर लक्ष केंद्रित करा. यामुळे मेंदूला शांतता मिळते. मग मनापासून अभ्यासाला सुरुवात करा. परीक्षेच्या निकालाची चिंता करण्यापेक्षा, सध्याच्या अभ्यासाच्या प्रक्रियेवर लक्ष द्या. प्रयत्न सोडू नका... प्रसिद्ध कवयित्री आसावरी काकडे म्हणतात..

***झरा लागेलच तिथे....खोद आणखी जरासे***
***उमेदीने जगण्याला.....बळ लागते थोडेसे...***

तुम्हांला परीक्षेसाठी खूप शुभेच्छा..

– किरण केंद्रे
कार्यकारी संपादक

# आंबेडकर गुरुजींच्या आठवणी

अवधूत डोंगरे

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बरीच लहान-मोठी चरित्रं लिहिली गेली आहेत. पण त्यातल्या कोणत्याही चरित्रात तुम्हांला माझा उल्लेख सापडणार नाही. त्यांच्या आठवणी सांगणारी अनेक पुस्तकंही प्रकाशित झाली आहेत, त्यातसुद्‌धा तुम्हांला माझं



नाव सापडणार नाही. यात काही चूक नाही. त्यांच्या आयुष्यात अनेक माणसं येऊन गेली असतील, तसाच मी एक. सहाएक महिने रोज एक-दोन तास त्यांच्यासोबत घालवायची संधी मला मिळाली, पण त्याबद्दल मी कधी काही लिहिलं नाही किंवा कुठे काही बोललो नाही. मग माझं नाव त्यांच्या चरित्रात येण्याचं काही कारणच नाही. पण आज मी, माझ्याकडे जमा झालेल्या त्यांच्या थोड्या आठवणी सांगणार आहे.

माझं नाव रघुनाथ भातडे. मी १९१८ साली 'व्हर्नाक्यूलर फायनल'ची परीक्षा दिली. ही परीक्षा म्हणजे आताची सातवी इयत्ता. तेव्हा मी तेरा-चौदा वर्षांचा होतो. प्राथमिक शाळेचं शिक्षण पूर्ण झाल्याचं प्रमाणपत्र या परीक्षेनंतर मिळायचं आणि त्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राथमिक शाळामास्तर किंवा अशा काही नोकऱ्याही त्या काळी मिळायच्या. या परीक्षेची चांगली तयारी व्हावी, म्हणून मी आणि माझे आणखी चार मित्र मिळून आंबेडकर गुरुजींकडे शिकवणीला जायचो, तेव्हाच्या या आठवणी आहेत.

आंबेडकरांना बडोद्याच्या गायकवाड महाराजांनी शिष्यवृत्ती दिल्यामुळे १९१३ ते १९१६ अमेरिकेतल्या कोलंबिया विद्यापीठात उच्चशिक्षणासाठी जाता आलं. तिथे पीएच.डी.पर्यंतचं शिक्षण घेऊन ते आणखी शिकण्याकरता लंडनला रवाना झाले, पण तोवर त्यांच्या शिष्यवृत्तीची मुदत संपली. त्यामुळे लंडनमधलं शिक्षण सुरुवातीलाच अर्धवट सोडून त्यांना भारतात परत यावं लागलं. मग शिष्यवृत्तीच्या अटीनुसार ते बडोद्यात संस्थानाच्या प्रशासनात नोकरी करायला गेले, पण तिथे त्यांना अस्पृश्यतेच्या कारणामुळे राहायला घरही मिळालं नाही. मग अपमानित होऊन ते मुंबईला परतले. नंतर १९२० साली त्यांना पुन्हा शिष्यवृत्ती मिळून ते लंडनला पुढचं शिक्षण पूर्ण करायला गेले. पण मधल्या तीनेक वर्षांच्या काळात जेव्हा ते मुंबईत राहत होते, तो त्यांच्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी खूप अडचणीचा काळ होता.

मुंबईत आंबेडकरांचं कुटुंब परळला बीआयटी चाळींमध्ये ५० आणि ५१ क्रमांकाच्या खोल्यांमध्ये राहायचं. यातली एक खोली कुटुंबाला राहण्यासाठीची होती, तर एका खोलीत आंबेडकरांचा अभ्यास चालायचा. त्याच खोलीत ते आमचे शिकवणीचे वर्ग घ्यायचे. त्या काळात त्यांना घर चालवण्यासाठी बाहेरही शिकवण्या घ्याव्या लागत होत्या.

व्हर्नाक्यूलर फायनलच्या परीक्षेत सगळे पेपर मराठीतच द्यायला लागायचे. भूगोल, इतिहास, गणित, विज्ञान आणि मराठी, असे विषय होते. हे सर्वच विषय आंबेडकर गुरुजी आम्हांला शिकवायचे. आमच्यातल्या रमेश नावाच्या एका मित्राने पहिल्यांदा त्यांना 'आंबेडकर गुरुजी' असं म्हटलं, म्हणून आम्ही सगळेच त्यांना तसं म्हणायला लागलो. ते परदेशात बरंच शिकून आलेत, असं ऐकून असल्यामुळे आम्हांला त्यांची सुरुवातीला भीती वाटायची. त्यांचा चेहराही इतका गंभीर असायचा की थोडं भेदरायला व्हायचं. पण ते आम्हांला एकदाही ओरडले नाहीत. तासाभराच्या शिकवणीत अर्धा तास ते शिकवायचे आणि अर्धा तास सरावासाठी काही प्रश्न द्यायचे. आम्ही सराव करत असताना ते एखादं पुस्तक वाचण्यात पूर्ण गढून गेलेले असायचे. मग सरावाचा भाग झाल्यावर आम्ही निघून गेलो तरी त्यांना कळायचं नाही. आम्ही त्यांना जाताना विचारायचो, कधी ते मान डोलवायचे, कधी काही म्हणायचेच नाहीत.

त्यांची ती खोली अनेक इंग्रजी आणि काही मराठी पुस्तकांनी भरलेली होती. तरी, नंतर मला कळलं की, त्यांच्याकडे याहून कितीतरी पट अधिक पुस्तकं होती, पण लंडनहून त्यांचं सामान मुंबईत घेऊन येणारं जहाज पहिल्या महायुद्धाच्या धामधुमीत बुडालं. त्यात त्यांची बरीच पुस्तकं समुद्रात गेली. पहिलं महायुद्ध १९१४ ते १९१८ असं सुरू होतं. त्या काळच्या या गोष्टी आहेत.

एकदा आंबेडकर गुरुजींनी सांगितलेला सरावाचा भाग लिहिताना माझा बराच वेळ गेला. बाकीचे मित्र त्यांचं ठरलेलं लिहून निघून गेले. मला आणखी दहा-पंधरा मिनिटं लागली. ते झाल्यावर मी गुरुजींना 'जाऊ का' असं विचारलं. नेहमीप्रमाणे ते एका पुस्तकात

गढून गेले होते. मग मी कुतूहल वाटून जवळ जाऊन पाहिलं, तर ते काही लिहितायंत असं वाटलं. ते बरेचदा पुस्तकांमधलं वाचून काही टिपणं काढत असायचे किंवा पुस्तकांच्याच समासात काही लिहायचे, तसंच हे सुरू असेल असं मी समजत होतो. पण आणखी जवळ जाऊन पाहिलं तर त्यांच्या डोळ्यांत पाणी होतं. आंबेडकर गुरुजींचं असं रूप मी पहिल्यांदाच पाहिलं. त्यांच्या समोरच्या पुस्तकात एक कागद होता. ते इंग्रजीतलं पत्र होतं, एवढं मला कळलं, पण मला तेव्हा इंग्रजी भाषा धड समजत नव्हती. मग मी गुरुजींच्या जवळ जाऊन विचारलं, 'गुरुजी, बरंय ना?' ते आधी काही बोलले नाहीत, म्हणून मी परत 'गुरुजी' अशी जरा जोरात हाक मारली. तेव्हा त्यांनी अचानक जाग आल्यासारखं माझ्याकडे पाहिलं नि डोळे पुसले.

मग ते मला म्हणाले, "मला रडत बसायला आवडत नाही. पण डोळ्यांतून येणारं पाणी आपल्या हातात नसतं. रघू, तू लहान आहेस, तुला काय सांगणार!"

तरी, मी तिथेच उभा राहिलो. मग ते स्वतःशीच पुटपुटल्यासारखं काही मिनिटं बोलले, "पैसे नसल्यामुळे शिक्षण अर्ध्यात सोडावं लागलं, पैसे नाहीत म्हणून पुस्तकं घेताना हात आखडता घ्यावा लागतो, पैसे नाहीत म्हणून घरातल्यांची पोटं पुरेशी भरता येत नाहीत. बायको नि भावजय आहेत म्हणून हे घर चाललं आहे."

मग ते खुर्चीत गप्प बसून राहिले आणि पुन्हा पत्र लिहायला लागले.

या काळात आंबेडकर गुरुजींची पत्नी रमाबाई आणि त्यांची भावजय तासभर पायपीट करून वरळीला चालत जायच्या. तिथे दोघीही शेणी थापायचं काम करत होत्या. याची त्यांना थोडी मजुरी मिळत होती, त्यात आंबेडकर गुरुजींच्या बाहेरच्या नि घरातल्या शिकवण्यांचे पैसे येत, त्यातून घर कसंबसं चालत होतं. त्यांचा मुलगा यशवंत लहानपणापासून अधूनमधून सतत आजारी असायचा. तरीही तो नि त्याची आई सरपण गोळा करायला रात्रीच्या अंधारात पुन्हा दूरपर्यंत चालत जायचे. आंबेडकर गुरुजी परदेशातून शिकून आलेले असतानाही त्यांना नोकरी न मिळाल्यामुळे कुटुंबावर ही वेळ आली. पण लोकांना ही दुरावस्था दिसायला नको, म्हणून आंबेडकर काकी अंधारात सरपण आणायला जात. आम्ही त्यांना 'काकी' म्हणायचो.

आंबेडकर गुरुजी आमच्यावर कधी रागवले नाहीत, पण ते तसे तापट होते. त्यांच्या समोर कोणी फार बोलायचं नाही. पण फक्त काकींनाच मी त्यांच्यावर आवाज चढवून बोलताना ऐकलं आहे. तेही पुस्तकांमुळेच झालेलं भांडण होतं. घरात इतकी चणचण असताना गुरुजींनी दोन पुस्तकं नवीन आणली, ती दिसल्यावर काकी म्हणाल्या, "जळली ती पुस्तकं. इथे खायला दाणं नाहीत आणि हा माणूस बुकांची पानं खातोय." यावर गुरुजी काही बोलले नाहीत. एवढा धिप्पाड शरीराचा, पीएच.डी.पर्यंत शिकलेला माणूस अशिक्षित बाईसमोर खाली मान करून बसला होता. पण इतर कोणासमोर आंबेडकर गुरुजींनी कधी मान खाली केल्याचं मला दिसलं नाही किंवा नंतर मी त्यांच्याबद्दल वाचलं तेव्हाही मला तसं काही सापडलं नाही.

काकी अशिक्षित असल्या तरी जगण्यातून आलेलं शहाणपण त्यांच्यात भरपूर होतं. त्याची जाणीव आंबेडकर गुरुजींनाही असावी. त्यामुळेच ते काकींशी भांडले तरी त्यांचं भांडण असं तोलामोलाचं असल्यासारखं वाटायचं. म्हणजे पुस्तकांवरून भांडण होतंय, तर गुरुजी स्वतःच्या शिक्षणाचा उल्लेख करून समोरच्या अशिक्षित पत्नीला गप्प बसवायचा प्रयत्न करताना कधी दिसले नाहीत. मलाही त्यांचं ते पुस्तकप्रेम कधीकधी अंगावर येणारं वाटायचं, पण त्यांचा हा तोलामोलाने भांडण्याचा स्वभाव मात्र मला कायम कौतुकाचा वाटला. भांडावं, पण समोरच्याला तुच्छ न लेखता भांडावं, तसंच समोरचा आपल्याला तुच्छ लेखत असेल तर तेही सहन न करता भांडावं, असा हा स्वभाव होता. इथे मी 'भांडण' असा शब्द वापरला तरी प्रत्येक वेळी ते काही आपण नेहमी भांडतो तसं नसायचं. काही वर्षांनी मोठमोठ्या नेत्यांशी त्यांचे वाद झाले, कधी मतभेद झाले, तेव्हा त्यांनी लेख लिहून, पुस्तकं लिहून ही 'भांडणं' केली. त्यांची आयुष्यात



इतरही भांडणं झाली असतील, पण हे पुस्तकं वाचत राहायचं आणि सार्वजनिक भांडणही पुस्तक लिहून करायचं, असा गुण खूप कमी नेत्यांमध्ये दिसतो.

○

आमची शिकवणी सुरू झाल्यावर दोनेक महिन्यांनीच आंबेडकर गुरुजींना सिड्नहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी मिळाली. आता त्यांना चांगला पगार नियमितपणे दर महिन्याला मिळणार, म्हणून त्यांच्या घरातले सगळे खूश झाले. त्या दिवशी काकींनी आम्हांला गूळ दिला. आता खरं म्हणजे उत्पन्नासाठी गुरुजींना शिकवण्या घ्यायची गरज नव्हती. मग त्यांनी बाहेरचे शिकवणीवर्ग बंद केले, पण आम्हांला घरात शिकवायचे ते पूर्ण करायला हवं, म्हणून आमची शिकवणी आणखी चार महिने सुरू राहिली. या दिवसांमधली आणखी एक आठवण आहे. आम्हांला मराठी विषयात एक कविता होती, त्यातल्या काही ओळी अशा :

***पाणीच पाणी ढगात रुसले***
***शेतांमधले पीक हे फसले***
***असले कसले पाणी आता***
***मारत राहते नभात बाता,***

***पड रे पाण्या जीवन दे***
***रुसवा तुझा सोडून दे***
***या वर्षीचे फुलू दे धान***
***हिरवेगार होऊ दे रान***

याबद्दल बोलताना आंबेडकर गुरुजींनी त्यांच्या पाण्याविषयीच्या काही आठवणी सांगितल्या. ते शाळेत असताना त्यांना तिथल्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या नळाला हात लावण्याची परवानगी नव्हती. शाळेतला शिपाई जवळ असेल आणि त्याने तोटी उघडून दिली तरच ते पाणी आपल्या स्वतंत्र पेल्याने प्यायची मुभा त्यांना होती. ते अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातीत जन्मल्यामुळे हे घडायचं. काही जाती अस्पृश्य– म्हणजे त्यांना इतरांनी स्पर्श करायचा नाही, हा नियम कोणी केला? या नियमाने आपल्याला आयुष्यात किती अपमान सहन करावे लागले याबद्दल ते बोलले. काही वेळा मोजकी माणसं त्यांना मोकळेपणाने पाणी द्यायची, पण बहुतेकदा पाण्यासारख्या साध्या गरजेसाठीही त्यांना शंभर वेळा विचार करावा लागला. याची बोच त्यांच्या मनात असणार, हे त्या कवितेवरून ते बोलत होते तेव्हा जाणवलं. त्यानंतर दहा वर्षांनी ते आणखी लख्खपणे लक्षात आलं. त्यांनी १९२७ साली महाडमध्ये चवदार तळ्यावर आपल्या सहकाऱ्यांसह पाणी पिऊन सत्याग्रह केला, ही ती घटना. या तळ्यावर गायीगुरांना आणि इतर धर्मांतल्या लोकांनाही पाणी घ्यायची परवानगी होती, पण अस्पृश्य समुदायांमधल्या माणसांना मात्र एक वेगळा घाट होता. हा घाट तळ्याच्या खालच्या बाजूला होता, त्यामुळे उन्हाळ्यात काही वेळा तिथे अगदीच कमी पाणी असायचं.

“पृथ्वीवर सत्तर टक्के पाणी आहे. ते समुद्राचं असेल, खारट असेल, पण ते आपल्याला पाऊस देतं. पण आपण त्या पावसाला मोकळेपणाने आपलंसं करत नाही. त्यात आपला पाऊस वेगळा, त्याचा पाऊस वेगळा, असं करत राहतो. कवितेत हे लिहिलेलं नसलं तरी तुम्हांला ते समजून घेता आलं पाहिजे,” असं आंबेडकर गुरुजी म्हणाले.

त्यांच्या डोळ्यांतलं पाणी मी पाहिलं, नंतर प्यायच्या पाण्याबद्दलचं त्यांचं हे बोलणं ऐकलं. हे सांगताना त्यांचे हातवारे पाहिले, त्यांचा चेहरा पाहिला, आणि ते मी कधी विसरू शकलो नाही. शिवाय, शाळेतलं शिक्षण फक्त परीक्षेपुरतं न ठेवता बाहेरच्या जगण्यातल्या अडचणी समजून घेण्यासाठी ते शब्द कसे वापरायचे, हेही त्यांच्यामुळे कळलं. पुढे मी शाळामास्तर झालो, तेव्हा माझ्या परीने मी हा प्रयत्न केला.

○

आंबेडकर गुरुजींच्या आठवणी सांगताना मी माझं कौतुक काय सांगायचं! पण तरी, त्यांच्या स्वभावाची एक बाजू यातून कळते, म्हणून हे मी इथे सांगतो आहे. शिवाय, मला त्यांनी पाठवलेलं एकमेव पत्र मला तुमच्यापर्यंतही पोचवायचं आहे, त्यामुळेसुद्धा ही छोटी आठवण जाता-जाता सांगतो.

माझं हस्ताक्षर पाहून आंबेडकर गुरुजींनी माझी

एकदा खूप स्तुती केली. इतर मित्रांना माझ्याकडून हे शिकायला सांगितलं. मग हसत म्हणाले, "मी स्वतः काही अजून हे शिकलो नाहीये, पण तुम्हांला अजून संधी आहे तोवर सुधारायचा प्रयत्न करा."

खरं म्हणजे मी अभ्यासात खूप हुशार नव्हतो. बेतासबात गुण मिळवून पास होत होतो. घरची परिस्थिती काही बरी नव्हती, त्यामुळे एकदा का व्हर्नाक्यूलर फायनल पास झालो की मग शाळामास्तरची नोकरी शोधायची, एवढंच माझं उद्दिष्ट होतं. माझ्या अभ्यासाचं कौतुक करण्यासारखं काही नसलं तरी, माझ्या हस्ताक्षराचं गुरुजींनी केलेलं कौतुक मला त्या काळात उमेद देणारं ठरलं. शिवाय, तीनेक महिन्यांनी आमची शिकवणी संपली तेव्हा जाताना त्यांनी मला एक शाईचं पेन भेट दिलं. इतर चौघांनाही वही, किंवा एखादं बारकं पुस्तक असं भेट दिलं. त्यानंतर १९२० सालपर्यंत त्यांच्याकडे पैसे साठल्यावर ते लंडनला शिक्षण पूर्ण करायला निघून गेले. मग तीन वर्षांनी परत येऊन त्यांनी मुंबईत प्रयत्न करून स्वतःचं बस्तान बसवलं. काकींचे आणि इतर कुटुंबियांचे कष्ट कमी होतील, अशी तजवीज केली. पुढे त्यांनी दादरला 'राजगृह' नावाचा बंगलाही बांधला, तेव्हा त्यात वरच्या मजल्यावर स्वतःच्या पुस्तकांना मोठीच्या मोठी जागा ग्रंथालय म्हणून करवून घेतली.

शिकवणी संपल्यावर आमचा तसा संपर्क नव्हता. पण ते लंडनहून परत आल्यावर कधी संधी मिळाली तर मी त्यांना थोडं तरी भेटायला जात असे. ते कधी हसून, कधी रिकाम्या चेहऱ्याने, कधी थोडं त्रस्त होऊन थोडं बोलायचे. पण आधी म्हटलं तसं, त्यांनी कधी वेळ नसल्याचं कारण सांगून फटकारलं नाही. माझ्यासारख्या माणसाला त्यांच्या आठवणी जपून ठेवण्यासाठी हे अनुभव पुरले.

दरम्यान, मला रत्नागिरीत शाळामास्तरची नोकरी मिळाली. नोकरीचं ठिकाण आमच्या गावापासून फार लांब नव्हतं, त्यामुळे आधी चालत आणि मग सायकलवरून मी ये-जा करायला लागलो. नोकरी मिळण्याआधी काही महिने मी रिकामा होतो, तेव्हा मी एक छोटी पुस्तिका लिहिली. 'सुंदर अक्षर कसे काढावे?' असं तीसेक पानांचं छोटंसं पुस्तक होतं ते. तेव्हा मी आंबेडकर गुरुजींना पहिलं आणि शेवटचं पत्र लिहिलं. त्यानंतर माझी त्यांची तुरळक भेट झाली, पुढे १९३५ साली काकी वारल्या तेव्हाही आमच्या मित्रांसोबत जाऊन मी त्यांना भेटलो, पण मग ते दिल्लीला गेल्यावर भेटीगाठी कमी झाल्या.

मला शाळामास्तरची नोकरी लागली असून त्यांच्या दापोली गावाजवळच माझं नोकरीचं ठिकाण आहे, असं मी त्यांना सांगितलं. त्यांनी दिलेल्या शिकवणीमुळे माझ्यात आत्मविश्वास आल्याचं लिहिलं. ते पत्रही त्यांनी दिलेल्या शाईच्या पेनाने मी लिहिलं होतं. शिवाय, आमच्या शाळेच्या पाणपोईवर मी माझ्या हस्ताक्षरात 'सर्वांसाठी खुली पाणपोई' असं लिहिलं, हेही मी त्यांना पत्रातून कळवलं.

यावर आंबेडकर गुरुजींनी पाठवलेलं उत्तर देऊन मी थांबतो :

**प्रिय रघू,**

नमस्ते.

तुझे पत्र मिळाले. तुला शाळामास्तराची नोकरी मिळाली, ही फार आनंदाची गोष्ट आहे. पण त्याहून आनंदाची गोष्ट म्हणजे तू पाणपोईवर तुझ्या हस्ताक्षरात लिहिलेले शब्द. कोंडलेल्या पाण्याला मोकळे करणे, याहून मोठे काय! तुझे पत्र वाचून समाधान वाटले.

तुझे पुस्तकही वाचतो. त्याचा आता मला उपयोग होणार नाही, हे तुला माझे हे 'सुंदर' हस्ताक्षरातले पत्र वाचून कळले असेलच. संसारास लागलास की कळव.

तुझा,
**भीमराव रा. आंबेडकर,**
मुंबई
ता. १५-३-१९२६

(डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चरित्रातल्या काही तपशिलांवर आधारित पूर्णपणे काल्पनिक कथा)

**संपर्क : ९४२१२२९२५१**

**दासू वैद्य**

# अद्‌भुत गोष्टी मंडळ

संध्याकाळी पिंपळाचं झाड पक्ष्यांमुळे आणि चौमुखी गणपतीचा पार पोरांमुळे दणाणून जात असे. शिवणापाणी, धप्पाकुट्टी, पकडापकडी, लपाछपी, लगोरी खेळून थकलेली पोरं पाराच्या पायऱ्यांवर बसून राहत. काही जण शर्टाच्या बाहीने निथळणारा घाम पुसत. पाराजवळ लाईटचा एकुलता एक खांब होता. विशेष म्हणजे हा लाईट लागायचा पण त्याचा प्रकाश मात्र फारसा पडायचा नाही. कारण त्या लाईटच्या काचेरी झाकणात चांगले ओंजळभर किडे साचलेले होते. कोणीतरी डोक्यावर टपली मारल्यासारखं पिंपळाचं पान वाऱ्याबरोबर गिरक्या घेत अंगावर येऊन पडायचं. गल्लीतल्या बायका पारावर तेलवात टाकायला येत. हा गणपतीही वेगळाच होता. चार तोंडांचा म्हणजे एकाच दगडात चारही बाजूंनी सारखीच गणपतीची मूर्ती कोरलेली. गणपती समोर एक महादेव होता. पण या महादेवाला पिंडच नव्हती. म्हणजे गणपतीला चार-चार तोंडे आणि महादेवाला पिंडच नाही. या पिंडीपासून अद्‌भुत गोष्टींना सुरुवात होते. काही जण म्हणतात की, पिंड अदृश्य झाली. काही जणांच्या मते, ही पिंड चक्क चोरीला गेलीय. यातली खरी गोष्ट बबूमामाने मला सांगितली





# लोडलप्पा

होती. या महादेवाला छान पांढरीशुभ्र स्फटिकाची पिंड होती. दगडांचा– शंखाचा अभ्यास करणारे एक गुरुजी गावात होते. त्या गुरुजींनी अभ्यास करून, या पिंडीचा दगड मौल्यवान आहे असं जाहीर केलं होतं. पिंडीच्या दगडाचं मौल्यवान असणं कानोकानी पसरत गेलं आणि एके दिवशी ती पिंडच गायब झाली. या गोष्टीला कित्येक वर्षे लोटली तरी अजूनही धोंडूतात्यांच्या स्वप्नात ही पिंड येते आणि 'मला सोडव.. मला सोडव' असं म्हणते म्हणे. त्या पिंडीला कोणी आणि कुठे डांबून ठेवलंय माहीत नाही.

गल्लीत बरेच अरुंद बोळ होते. दोन वाड्यांच्या मधली चिंचोळी जागा कधीकधी खुश्कीचा मार्ग म्हणून वापरली जाई. अशा बोळातून जाताना अंधार पडल्यावर भीती वाटे. ही भीती कमी होण्यासाठी आम्ही पोरं 'राम राम राम राम राम राम'असं पुटपुटायचो. पारावरचे दिवे वाऱ्याबरोबर हलायचे. म्हणजे दिव्याची ज्योत हलली की प्रकाश हलल्यासारखं वाटायचा. वरती पिंपळाची पानं वाजायची. अशा वातावरणात पाराच्या एका कोपऱ्यात आम्हां पोरांच्या अद्‌भुत गोष्टी सुरू व्हायच्या. कुठं–कुठं ऐकलेल्या गोष्टी असत. मला म्हणीआजी अनेक गोष्टी सांगायची. त्याच भांडवलावर मला भाव मिळायचा. अद्‌भुत गोष्टी मंडळात अद्‌भुत गोष्टी सांगण्यासाठी चढाओढ लागे. त्यात मध्यरात्री गल्लीत फिरणारा, डोक्यावर चमकदार मणी असणारा नाग हमखास रंगवून सांगितला जात असे. हा नाग फिरताना त्याच्या भोवती मोगऱ्यासारखा सुगंध दरवळत असे. गोष्टीत बरेचदा येणारं एक घुबडही होतं. या घुबडाला जर कोणी दगड मारला तर घुबड तो दगड चोचीत पकडत असे. खूप लांब जंगलात एक नदी होती. गरम पाण्याची. या नदीत घुबड तो चोचीतला दगड नेऊन टाकत असे. मग त्या नदीतल्या पाण्यात तो दगड जसजसा विरघळत जाई तसतसा इकडे दगड मारणारा माणूस हडकुळा होत जाई. गावात कोणी हडकुळा माणूस दिसला की, त्याने बहुधा घुबडाला दगड मारला असेल असं आम्हां पोरांना वाटे.

काही अद्‌भुत गोष्टींमधली गंमत कळत असे. पण काही गोष्टी मात्र कायम अद्‌भुतच राहत. अद्‌भुत गोष्टींमुळे मनात एक प्रकारचा ताण निर्माण होत असे. याउलट गोष्टीतली गंमत कळली की मनाला हलके हलके वाटे...जशी की यात्रेला गेलेल्या यात्रेकरूची गोष्ट. एकदा गावातले सावकार सहकुटुंब तीर्थयात्रेला गेले. समुद्रकाठच्या तीर्थक्षेत्री मुक्काम पडला. सोबत स्वयंपाकाची व्यवस्था होती. समुद्रकाठावर एका मोठ्या दगडावर बायकांनी चूल पेटवली. पोळ्यांसाठी पीठ भिजवणं सुरू होतं. तेवढ्यात चूल ठेवलेला दगडच हलू लागला. बायकांना वाटलं भूकंप होतोय. पण बाकी काहीच हलत नव्हतं. बायका घाबरून ओरडायला लागल्या. आता तर दगड चक्क चालू लागला. पेटलेली चूल दगडासह चालू लागली. हा आरडाओरडा ऐकून लोक गोळा झाले. दगड चुलीसह समुद्रात निघाला होता. बायकांना घाम फुटला. अंग थरथर कापू लागलं. हा प्रसंग ऐकताना आमचा पार हलतोय असं वाटत होतं. एकदाचा त्या चालणाऱ्या दगडाचा उलगडा झाला. तो चालणारा दगड म्हणजे समुद्रकाठावर विश्रांती घेणारं भलं मोठ्ठं कासव होतं. सगळ्यांचा ताणलेला श्वास हलका झाला. हुश्श...

आजही गणूने पुन्हा डोक्यावर मणी असलेल्या नागाचा विषय काढलाच. त्याच्या काकाला या मणीवाल्या नागाचे फरकांडे भल्या पहाटे रस्त्यावर दिसले होते. हा मणीवाला नाग आमचा हक्काचाच होता. तो कधीही त्याच्या डोक्यावरचा मणी चमकवत आमच्या गोष्टीतून फिरत असे. सुभाषला हा नेहमीचा विषय आवडला नसावा. तो म्हणाला, ''तो बोरछाप मणीवाला नाग सोडून नवं काही तरी सांगा राव...''

मध्येच थांबवल्यामुळे गणूला जरा राग आला. रागातच तो बोलला,''सगळ्यांना बोर छाप... बोर छाप म्हणतोस मग तूच सांग की एखादी खतरनाक गोष्ट '' सुभाषनेही हे आव्हान स्वीकारलं. त्याच्या डोक्यात एक

गूढ गोष्ट वळवळतच होती. तो नीट सावरून बसला. आम्ही जवळ सरकलो. दबक्या आवाजात गोष्ट सुरू झाली. सुभाषचा चेहराही अद्‌भुत वाटत होता. ''आपल्या नदीच्या वरती देशमुखांचा फुलमळा आहे. या मळ्यात मोगऱ्याची शेती आहे. सर्वत्र फुलांचा घमघमाट सुटलेला..'' या फुलांच्या घमघमाटात पुन्हा एकदा नवा नाग वळवळेल असे आम्हांला वाटलं पण गोष्ट खरंच वेगळी होती. सुभाष तल्लीन होऊन सांगत होता, ''या मळ्यात पोपटी पानांची तीन झाडं आहेत. असतील गुडघ्याएवढी.'' तेव्हाचा राग शांत न झाल्यामुळे मध्येच गणू बोलला, ''म्हणे पोपटी पानांची तीन झाडं... त्यात काय.. या पोपटी पानांच्या झाडांना काय पोपट लागलेत का ? फुसकी गोष्टंय.. ''

आम्ही गणूला चूप केलं. कारण सुभाष कधीतरीच पण धमाल गोष्ट सांगायचा. सुभाषलाही नवी गोष्ट सांगण्याची उत्सुकता होती. तो पुन्हा गोष्टीत घुसला.



''ती पोपटी पानांची तीन झाडं आहेत ना ती स्वतःची जागा बदलतात...''

बाप रे! सगळ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटलं होतं. गणपती समोरच्या दिव्याची ज्योत विचित्र हलू लागली. सुभाष त्या जागा बदलणाऱ्या झाडांचे वर्णन करत होता... 'विहिरीजवळ महादेवाचा ओटा होता. त्या ओट्याजवळ ही झाडं होती. एकदा शेतात काम करणारा गडी सकाळीच महादेवाला पाणी घालायला गेला. गड्याने पाणी घातलं. ताजी मोगऱ्याची फुलं पिंडीवर वाहिली. उरलेली चार फुलं सूर्याला म्हणून हवेत उधळताना त्याचं लक्ष समोर गेलं. तिथली पोपटी पानांची तीन झाडं गायब झालेली होती. बाप्पोव... या झाडांना जनावर तोंड लावत नव्हतं. झाडं तोडल्याच्या, उपटल्याच्या खुणाही नव्हत्या. गड्यालाही आश्चर्य वाटलं. मुळात अशी विचित्र झाडं कुणाच्याच पाहण्यात नव्हती. गड्याचं आयुष्य शेतात गेलेलं, पण झाडं अचानक गायब होणं त्यालाही माहीत नव्हतं. मग ही तीन झाडं गेली कुठं? गड्यानं एक-दोघाला झाडाचं गायब होणं सांगितलं तर ऐकणाऱ्यांनी हसण्यावर नेलं. पण गड्याच्या डोक्यातला भुंगा काही जाईना. शेतात इकडे तिकडे तो त्या झाडांना शोधू लागला. आजूबाजूला गुरे राखणाऱ्या गुराखी पोरांना झाडं दिसली तर सांगा म्हणून सांगून ठेवलं पण झाडांचा पत्ता नव्हता. सात-आठ दिवस गेले आणि एके दिवशी लिंबाच्या झाडाखाली खेळणारं एका गड्याचं पोरगं ओरडत आलं ''बापू ऽऽ देवाजवळची झाडं लिंबाखालच्या कडब्याच्या गंजीजवळ हाईत.'' गड्याच्या मनात शंका होतीच. तो पोरामागं धावतच गेला. पाहतो तो काय तीच पोपटी पानांची गुडघ्याएवढी तीन झाडं रांगेत उभी होती. दिसतही अशी होती, जशी काय आधीपासून इथेच आहेत. गडी घाबरला. पोराला घेऊन धूम पळत सुटला. मालकाला ही गोष्ट सांगितली. मालकानेही ही गोष्ट हसण्यावर नेली. शेवटी मालकाला गड्याने मळ्यात नेऊन सर्व प्रकार दाखवला. झाडाचं जागा बदलणं मालकालाही पटलं. त्या झाडांना पाहण्यासाठी लोकांची गर्दी होऊ लागली. बातमी गावात पसरली होती. जुनी माणसे कुजबुजू लागली. कोणी तरी म्हणालं, ''फुलाच्या मळ्यात खूप वर्षांपूर्वी विहिरीत बुडून तीन पोरं मेली होती. तीच पोरं झाड होऊन मळ्यात फिरतायत.'' शेवटी मालकाने लांबच्या गावाहून जाणत्याला बोलावलं: जाणता आला. पण तेवढ्या वेळात पोपटी पानांची झाडं गायब झाली होती. शेवटी विहिरीजवळच्या महादेवाला भंडारा करा, अन्नदान करा... असं काहीतरी सांगून जाणता निघून गेला. मालकानं भंडाऱ्यात गावजेवण दिलं. जेवताना लोक चर्चा करू लागले. अशा जागा बदलणाऱ्या वनस्पती जंगलात असतात. आभाळात उंच उडणाऱ्या पक्ष्यांच्या विष्ठेतून हे बी फुलांच्या मळ्यात पडलं असावं. असा काही जणांनी अंदाज सांगितला.' लोक भरपेट जेवले. चर्चा सुरूच राहिल्या. या पोपटी पानांच्या झाडांबद्दल आम्हां पोरांनाही थोडी भीती आणि जास्त कुतूहल वाटू लागलं. नदीचं पाणी उतरल्यावर एकदा फुलाच्या मळ्यात ही झाडं शोधायला जायचं ठरू लागलं. तेवढ्यात पारामागच्या वाड्यातून धोंडूतात्यांचा आवाज आला, ''पोरांनो, रात्र किती झालीय. घरंदारं नाहीत का रे तुम्हांला'' चड्‌ड्या झटकत पोरं उभी राहिली आणि पाहता पाहता घरोघर पसार झाली.

खरं तर या अद्‌भुत गोष्टी मंडळाचा मी आधीपासूनच सभासद होतो. गोष्टी सांगायला आणि ऐकायला मला खूप आवडायचं. एकदा कोणीच सुरू करेना म्हणून आणि पुन्हा एकदा मणीवाला नाग येऊ नये म्हणून मी एक गोष्ट सांगितली. ती गोष्ट होती उजव्या तळहातावर एकच केस असणाऱ्या माणसाची. तळव्यावर केस असणारा माणूस खंडोबाच्या माळाखालच्या शेतात राहत होता. तो कधीही गावात येत नसे. कुणाशी बोलतही नसे. हातात तो कायम हातमोजे घालत असे. त्याच्या जेवणाचा डबा रोज घरून यायचा. तो कुणासमोर कधी जेवायचा नाही. त्याच्या समोर तर कधीच कुणाला जेवू द्यायचा नाही. कारण या माणसानं बघितलेलं अन्न विषारी व्हायचं. म्हणजे याची नजरच विषारी होती. एकदा स्वतःच्या मुलीच्या लग्नासाठी म्हणून हा माणूस गावात आला. चुकून त्याली नजर स्वयंपाकावर पडली तर त्याने सर्व अन्न शेतात खड्डा करून पुरायला लावलं. दुसरा स्वयंपाक करून लोकांना जेवू घातलं. या विषारी नजरेचा फटका एकदा

शेतावरच्या मजूराला बसला होता. या माणसाने पाहिलेली भाकरी खाल्ल्यामुळे तो मजूर उलट्या होऊन मेला होता. कुणीतरी या विचित्र माणसाला तळहातावरचा केस उपटून टाकण्याचा सल्ला दिला. कदाचित नजरेतला जहरीपणा जाईल म्हणून त्याने तळहातावरचा केस उपटलाही. पण आठ-दहा दिवसांनी पुन्हा एकदा तळहातावर तिथेच एक केस उगवला. ही गोष्ट मला बबूने सांगितली होती.

दिवस संपून कधी एकदा संध्याकाळ होते आणि आम्ही गणपतीच्या पारावर गोळा होतो, असं वाटायचं. या अद्भुत गोष्टींचा परिणाम आमच्यावर दिवस-रात्र राहत असे. शाळेत डबे खाताना पुन्हा एकदा या गोष्टींतल्या विषयांवर चर्चा होई. मला एक दिवस आमच्या शाळेतल्या प्रार्थनेच्या रांगेत पोपटी पानांची तीन झाड उभी असलेली दिसली. 'बाबोव... दचकलात नं?' स्वप्न होतं ते. म्हणीआजी म्हणायची, 'मनी वसे ते स्वप्नी दिसे.' असो. काही झालं तरी संध्याकाळी आम्ही पारावर जमायचोच. खेळून दमायचो. नंतर पाराच्या कोपऱ्यात आमचं अद्भुत गोष्टी मंडळ सुरू व्हायचं.

आज मंडळात रतनू आला होता. मंडळात रतनू जुनाच होता. हा शिक्षणासाठी शहरात राहायचा. सुट्टी असली की घरी यायचा आणि पठ्ठ्या नव्या गोष्टीसह संध्याकाळी पारावर हजर असे. हा फक्त गोष्ट सांगायचा नाही तर प्रत्यक्ष बरेच पराक्रमही करायचा. अशा या पराक्रमी माणसाच्या गोष्टी शहरातल्या असत. बर्म्युडा ट्रँगल, उडत्या तबकड्या रंगवून सांगायचा. त्याने एकदा रस्त्यावरून मोटारसायकल उडवणाऱ्या टपोरी मुलाची गोष्ट सांगितली होती. हेल्मेट घालून मोटारसायकल उडवणारा आम्हांला अद्भुत वाटला होता. हेल्मेट घातल्यावर काहीही पराक्रम करू शकतो असा आमचा समज झाला होता. पण रतनूच्या या गोष्टीमुळं आमचं अद्भुत गोष्टी मंडळ धोक्यात आलं होतं. या गोष्टीतील उडणाऱ्या मोटारसायकलची प्रेरणा घेऊन हेम्यानं (मूळ नाव हेमंत) सायकल चालवताना सायकल हवेत उडवण्याचा प्रयत्न केला. बऱ्यापैकी हातापायाला मार लागला, इथपर्यंत ठीक होतं पण खरा घोटाळा वेगळाच होता. रतनूच्या गोष्टीतल्यासारखे हेल्मेट आमच्या हेम्याने कुठूनतरी मिळवलं. शाळेच्या रस्त्यावरच्या टेमकाडावरून हवेत सायकल उडवली. हेल्मेट नीट घातलं नव्हतं. पडल्यावर तेच डोक्यात अडकून बसलं. आरडाओरडा झाला. कसं तरी हेम्याचं डोकं सोडवलं. जीवावर बेतलं असतं. हेम्याची आई खूप रागावली. ''त्या पारावरच्या भुताखेताच्या गप्पांमुळंच पोरांची टाळकी बिघडतायत.'' या सूरात सूर मिसळून घराघरात ओरडाओरडी, रागवारागवी झाली. अद्भुत गोष्टी मंडळ बंद झालं. पारावरच्या गोष्टी थांबल्या. आम्ही पोरं पाराभोवती घुटमळू लागलो. मग हळूहळू पाराच्या पायऱ्यावर बसू लागलो. भूक लागलेल्या मुलांसारखे आमचे चेहरे गरीब झाले. ही भूक गोष्टींची होती. अद्भुत गोष्टी मंडळाची जागा बदलण्याचाही आम्ही प्रयत्न केला. पण दिव्याचा हालता प्रकाश आणि पारावरची पिंपळाच्या पानांच्या आवाजाची रंगत येईना. वेगळ्या जागेत गोष्टच रंगेना. मग एक दिवस बबूमामाने आमची कोंडी फोडली. तो तसा गावातला वेगळा माणूस. जिवंत साप पकडायचा. सुंदर गणपती तयार करायचा. चित्र काढायचा. त्याला आमची दया आली. एका संध्याकाळी पारावर बसून त्यानेच आमच्याशी गप्पा मारल्या. साप पकडतानाच्या गमती सांगितल्या. एकदा एका घरात साप निघाला. पाहता पाहता गायब झाला. सगळे लोक कंदिलाच्या प्रकाशात साप शोधू लागले. साप काही सापडेना, सगळे कोनेकोपरे शोधून झाले. धान्याचे डबे, मडके आणि कणगी पालथ्या केल्या पण साप डोळ्यांसमोर गायब झाला होता. शेवटी कंदिल हातात धरून आखडलेले आबा कंदिल खाली ठेवून ओट्यावर टेकले तर त्यांच्या धोतराच्या सोग्यातून साप बाहेर पडला. ही गंमत ऐकून आम्ही खळखळून हसलो. दुसरे दिवशी मात्र आम्ही सगळे पोरं उडवलेल्या चिमण्या दाणे टिपायला परतून याव्यात तसे गोळा झालो आणि अदभुत गोष्टी मंडळ पुन्हा सुरू झालं. देवासमोरचा प्रकाश वाऱ्याबरोबर हलू लागला. पिंपळाची पानं वाजू लागली. डोक्यावर मणी असलेला नाग दबा धरून बसलेलाच होता...

**(क्रमशः)**

**संपर्क – ९४०३५८४१११**

# चला चित्र रंगवूया...!

रेश्मा बर्वे

**खारुताईला परीक्षेच्या पेपरात खूप सोपे सोपे प्रश्न आले. काय बरं आलं असेल तिच्या पेपरात ? चित्र पूर्ण करा आणि छानसे रंगवा.**



# चळवळ्या चिंटू



डॉ. नंदू मुलमुले

चिंटू नावासारखाच छोटा, चौथीत जाणारा मुलगा. चेहरा उजळ, केस कपाळावर आलेले, डोळ्यांत हुशारीची चमक, पण हे सारे पटकन नजरेत भरणे कठीण, कारण चिंटू एका जागी स्थिर राहणे कठीण! सतत चळवळत राहणार. कुठल्याही वेळी नुसता पळत असायचा. पेपर दे म्हटलं की निघाला धावत. वाटी आण म्हटलं की चढला ओट्यावर. उशी ठेव म्हटलं की लागला गादीवर नाचायला. रात्रीची झोप सोडली तर जागेपणी स्थिर बसलेलं त्याला कुणी पाहिलं नसेल. चिंटूचे पाय सतत थिरकत असायचे.

बाबा दटावायचे, 'चिंटू न हलता खुर्चीत बैस कसा!' चिंटू चुळबुळ करीत कसाबसा मोजून दहा सेकंद दम धरायचा. त्यातही पायावर पाय आपट, गुडघ्यावर टपल्या मार, खांदे हलव, तोंडाने चकचक आवाज काढ हे सुरूच. अकराव्या सेकंदाला निघाला उड्या मारत.

चिंटूची मोठी ताई शांतपणे बुद्धिबळाचा डाव मांडून बसायची. कधी पुस्तक वाचत असायची. भोवताली चिंटू एखाद्या पाकोळीसारखा वेडावाकडा भिरभिरत असायचा. घरी आई, शाळेत शिक्षक... सारे वैतागून जायचे. प्रार्थना म्हणताना खांदे उडव, पाय हलव, काही नाही तर डोळे फिरव असे चालायचे. वर्गात गणित अर्धवट सोडून द्यायचा, कविता पाठ असून दोन कडवी गाळायचा, चित्रकलेत फुलाची नुसती दांडी, पक्ष्याचा एकच पंख काढायचा. तोंडी सारे पाठ, पण उत्तर अर्धवट सोडायचा. अर्धे पाढे खाऊन टाकायचा! मग गुण कमी पडायचे. शिक्षक शिक्षाही करायचे. मुले चिडवायची. त्याला खेळात घ्यायची नाही. चिंटूला वाईट वाटायचे. पण दुसऱ्या क्षणी चळवळ सुरू. जणू त्याच्या अंगात एक मोटर फिट केली कुणी, जी सतत थडथड करीत होती.

एके दिवशी शाळेत मुलांची तपासणी करायला एक डॉक्टर आले. चिंटूला तपासताना डॉक्टरांची गडबड उडाली. त्यांचा पेन उचल, कागदावर काहीतरी खरड, स्टेथो कानाला लावून पहा! डॉक्टरांना गंमत वाटली. 'हा असा करत असतो सारखा,' शिक्षकांनी तक्रार केली. 'याला काही आजार आहे का हो?' बाबांनी विचारलं.

डॉक्टरकाका म्हणाले, 'चिंटू हा एक अतिक्रियाशील मुलगा आहे. सारीच मुले कमीअधिक चळवळी असतात, चिंटू थोडा जास्त आहे. अनेक माणसे कधीतरी अशा अवस्थेतून जातातच.' ते चिंटूकडे वळले. 'चिंटू,



तुला इथे दिसणाऱ्या पाच गोष्टींची नावे सांगितलीस की माझा पेन देईन!'

चिंटू भोवताली पाहू लागला. 'तुमची कानाला लावायची नळी, हाताला बांधायचा पट्टा, ताप मोजायचं थर्मामीटर, आणि...खिडकीतला डबा, अं..अं..टेबलावर फुले, अजून...' एवढं मोजेतोवर त्याची चळवळ काहीशी मंदावली.

'झाले पाच, शाब्बास,' डॉक्टरांनी पेन धरला. चिंटूने कागदावर काहीतरी खरडले आणि तो पेन टाकून पळाला. 'चिंटूचे बाबा, त्याचे एक टाईमटेबल आखा. उठणे, दात घासणे, अंघोळ करणे, कपडे घालणे, दप्तर भरणे... ठरलेल्या वेळी गोष्टी करण्याची शिस्त लावा. एकट्या चिंटू कशाला, सगळ्याच मुलांना याचा फायदा होतो. ताट उचलून ठेवणे, दोरीवरून कपडे काढणे, बूट पॉलिश करणे, गोष्टीचे एखादे पान मोठ्याने वाचणे...प्रत्येक कामाला शाबासकी द्या. कार्टून पाहू देणे, आवडीचे गोड खाऊ देणे असे बक्षीस द्या. भरपूर मैदानी खेळ जसे फुटबॉल, पोहणे, धावणे, उंच उडी, कबड्डी खेळू द्या.'

शिक्षकांनी मुलांना सांगितले, 'चिंटू तुमचा मित्र आहे, त्याला सोबत खेळू द्या. त्याचा हात धरून ठेवा, चिंटूशी खेळाल तर खेळाचा तास १५ मिनिटे जास्त!'

बाबांनी साऱ्यांची सिंहगडावर सहल काढली. चिंटू उड्या मारत सर्वात पुढे! बाबांनी तानाजी मालुसरेची गोष्ट सांगितली. चिंटू थोडा वेळ का होईना, गोष्टीत गुंगून गेला.

शाळेचे स्नेहसंमेलन, हेडसरांनी डान्स स्पर्धा ठेवली. पहिले नाव चिंटूचे टाकले. चमत्कार घडला. चिंटूच्या अंगात आधीच ऊर्जा पुरेपूर भरलेली! एकेक टप्पा शिकत चिंटू त्याच्या आवडीच्या गाण्यावर छान नृत्य करू लागला. त्याच्या अतिक्रियेला वाट मिळाली. चिंटू पहिला आला. त्याला पाचशे रुपये बक्षीस मिळाले. सर म्हणाले, ''हा बसून राहण्यासाठी नाही, नाचण्यासाठी जन्माला आला आहे!''





खळाळता, कडेकपारीतून उड्या मारत वाहणारा झरा जसा दूरवर नदीत शांत होतो, तसा चिंटू स्थिरावत गेला.

**संपर्क – ९४२२८७३३०३**

# इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीच्या'
## मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण स्वाध्यायपुस्तिका













**ठळक वैशिष्ट्ये**


- प्रचलित पाठ्यपुस्तकावर आधारित
- स्वयं अध्ययनास चालना देणारी
- लेखनाचा अधिकाधिक सराव
- प्रश्नप्रकारांमध्ये वैविध्य
- विषयांचे दृढीकरण
- जिज्ञासावर्धक आणि विचारप्रवर्तक प्रश्न
- पाठ्यांशावर आधारित परंतु पाठ्यपुस्तकांच्या पलीकडील ज्ञानाच्या वाढीला चालना देणारे प्रश्न
- महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांचा लेखन सहभाग
- अल्प किंमतीत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य











**स्वाध्याय पुस्तिकांच्या खरेदीवर ४०% सवलत**

वरील स्वाध्यायपुस्तिकांच्या खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा

**विभागीय भांडारे** पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

# आज काय झालं ?




कार्टुनिस्ट इरा
संपर्क: ९४२२३२५८३८


कुहू-नील यांना कायमच एकमेकांच्या खोड्या काढायला आवडतात. आज काय झालं ते पहा -




बालदोस्तांनो, तुमच्याबाबतीत पण असं कधी घडलंय का? तुमची झालेली फजिती नक्की लिहून पाठवा :)

बालभारतीच्या कविता

डॉ. संगीता बर्वे

भाग ४

## संत निर्मळा



*आनंदे वोविया तुम्हांसि गाईन।*
*जीवो भावें वोवाळीन पायांवरी ॥१॥*
*सुकुमार साजिरी पाउले गोजिरी।*
*ते हे मिरवलीं विटेवरी ॥२॥*
*कटावरी कर धरोनी श्रीहरी।*
*उभा भीमातीरीं पंढरीये ॥३॥*
*महाद्वारी चोखा तयाची बहीण।*
*घाली लोटांगण उभयंता ॥४॥*

संतपरंपरेमध्ये संतकवयित्रींनी महत्त्वाचा ठसा उमटवला आहे. महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई या संतकवयित्रींनी अभंगांमधून भक्तीची आर्तता व्यक्त केली.

**संत निर्मळा –**

निर्मळा ही संत चोखामेळ्याची बहीण, भावाप्रमाणेच तीदेखील विठ्ठलभक्त होती. कवयित्री होती. चोखामेळ्याचे पूर्ण घरदारच विठ्ठलमय झाले होते. त्याची बायकोसुद्धा अभंगरचना करीत असे. चोखोबाची बहीण निर्मळा आणि तिचे पती बंका हे विठ्ठलाच्या भक्तिरसात बुडून गेलेले दाम्पत्य होते. दलित असल्यामुळे त्या काळात विठ्ठलाच्या गाभाऱ्यात त्यांना जाऊ देत नसत. मात्र आहे त्या परिस्थितीत समाधान मानून महाद्वारातूनच विठ्ठलाचे दर्शन घेऊन निर्मळा धन्य होत असे.

या अभंगामध्ये विठ्ठलाच्या सगुण रूपाचे वर्णन करताना निर्मळा म्हणते,

या ओव्यांमधून तुमचे गुणगान गाताना मनापासून माझे पंचप्राण तुमच्या पायांवर ओवाळून टाकीन. (१)

सुकुमार, सुंदर, गोंडस अशी तुझी पावलं विटेवर किती शोभून दिसत आहेत.! (२)

दोन्ही हात कमरेवर ठेवून पंढरपूरच्या भीमानदीच्या काठी हा श्रीहरी उभा आहे. (३)

त्याच्या महाद्वारापाशी उभी राहून चोख्याची बहीण, निर्मळा तुम्हां दोघांनाही लोटांगण घालते आहे. (४)

एका सहजसुंदर, लयबद्ध अभंगाची रचना निर्मळेने केली आहे. या अभंगामध्ये ओवी हा शब्द अभंग या अर्थाने वापरला आहे.

काव्यात गुंफलेले शब्द म्हणून ओवी आणि कायम टिकणारे म्हणून अभंग. या ठिकाणी

'आनंदे वोविया तुम्हांसि गाईन।' असे म्हणताना निर्मळा विठ्ठलाची स्तुती करते आहे. ओवी गाणे म्हणजे स्तुती करणे असा वाक्प्रचारात्मक अर्थ या ठिकाणी घेतला आहे.

या ओळीतून आपण परमेश्वराची स्तुती करू असा निर्धार तिने व्यक्त केला आहे आणि तोदेखील आनंदाने ! विठ्ठलाच्या सगुण रूपाचं वर्णन प्रत्येक संतानेच आपापल्या परीने केले आहे. जसे की,

'रूप पाहता लोचनी सुख झाले वो साजणी' हा ज्ञानेश्वरांचा अभंग किंवा 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी' हा तुकारामांचा अभंग उदाहरणादाखल पाहता येईल. विठ्ठलाची सुकुमार पावले विटेवर उभी आहेत. हा संदर्भ भक्त पुंडलिकाच्या भेटीनंतरचा आहे. पुंडलिकासारख्या महान भक्ताने आज्ञा केली म्हणून भीमा नदीच्या काठी भक्ताच्या भेटीसाठी विठ्ठल विटेवर उभा राहिला. भक्त जसा देवासाठी काहीही करावयास तयार आहे तसा देवदेखील भक्तासाठी काहीही करण्यास तयार असतो, भक्त त्याच्याशी संवाद करतो. प्रसंगी भांडणही करतो. असा निर्मळ, निरागस देवभक्त संबंध असतो. निर्मळा महाद्वाराशी उभी राहून विठ्ठलाचे दर्शन घेते. पंढरपुरास महाद्वारापासून विठ्ठलमूर्ती पुष्कळच आत आहे. पण पूर्वी मंदिराला दरवाजा नव्हता. ते कायम उघडे



असे आणि महाद्वारापासून त्याचे दर्शन घडत असे. निर्मळाने विठ्ठलाबरोबर भाऊरायाला, चोखोबालाही नमस्कार केला आहे. ‘घाली लोटांगण उभयतां’ असे म्हटले आहे.

चोखोबाच्या अस्थी महाद्वारापाशी पुरून त्यावर समाधी बांधलेली आहे. गावकुसाची भिंत बांधताना ती अकस्मात कोसळून त्याखाली सापडून चोखोबांचा अंत झाला. नामदेवांनी त्यांच्या अस्थी पंढरपुरास आणून महाद्वाराशी पुरल्या व तेथे समाधी बांधली. आपल्या भावाची समाधी विठ्ठलाच्या दाराशी बांधली गेली याचे निर्मळाला अप्रूप वाटते. अभंगाच्या शेवटच्या ओळीमध्ये तिने ‘महाद्वारी चोखा तयाची बहीण’ असे म्हटले आहे. चोख्याची मी बहीण हा अभिमान तिने व्यक्त केला आहे. चोखोबाला सर्व जण संत मानतात आणि त्याचे भाग्य एवढे की विठ्ठलाच्या दाराशी त्याला कायमचे स्थान मिळाले, त्या चोख्याची मी बहीण आहे हा आनंद तिच्या मनामध्ये आहे.

भाषेचा सोपपणा. रचनेचा सहजपणा आणि ‘वोविया गाईन’ ही श्रद्धा निर्मळेच्या अभंगामधून व्यक्त झाली आहे.

संत कान्होपात्रा आणि संत निर्मळा या दोघींनीही केलेला परिस्थितीचा स्वीकार त्यांच्या अभंगामधून दिसतो. रूपसुंदर कान्होपात्रा तिच्या व्यवसायामुळे हीन ठरली तर निर्मळा त्या वेळच्या जातिभेदामुळे. परंतु दोघींमध्ये भक्तीची आर्तता तेवढीच उत्कट आहे. परमेश्वराशिवाय आपल्याला जवळ घेणारे कोणीही नाही याचे भान आहे.

**संपर्क : ९५४५९९५६९३**




# एक तुकडा



■ सुधीर पाठक

एक खडा साखरेचा
पाण्यामध्ये विरघळणारा...



एक खडा वाळूचा
पाण्यामध्ये बसणारा...

एक तुकडा लाकडाचा
पाण्यावर तरंगणारा...



एक तुकडा लोखंडाचा
पाणी बाजूला सारणारा...

एक तुकडा विटकरीचा
पाण्यामध्ये भिजणारा...



एक तुकडा तुरटीचा
पाणी स्वच्छ करणारा...

या पाण्यामधल्या तुकड्यांना
जीव नाही जगणे नाही ...



मात्र काम  झाल्यावर
ओसाडावर पडून राही ...

संपर्क : ७५८८११०७२३

बालभारती

# अभिजात मराठी

मराठी भाषा विभाग

भाषा जनाची | भाषा मनाची

**मराठी भाषेला ‘अभिजात’ भाषेचा दर्जा प्राप्त झाला आणि सगळ्या मराठी भाषिकांची मान अभिमानाने उंचावली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेली आपली मराठी ही जगातील एक महत्त्वाची भाषा आहे. मराठी भाषेच्या या वारशांचा सन्मान करणे आणि पुढील पिढ्यांकडे तो अधिक समृद्ध रूपात सुपूर्द करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी अभिजात भाषा झाली आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी ‘बालभारती’ आणि महाराष्ट्र शासनाचा ‘मराठी भाषा विभाग’ मिळून ‘अभिजात मराठी’ हा उपक्रम राबवत आहोत. या विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येत आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

प्रवीण दवणे

# नवे शब्द मित्र होऊन वाट पाहतात !

जिवलग मित्र ज्याप्रमाणे आपली वाट पाहतात, त्याप्रमाणे शब्दही आपले मित्रच आहेत. तेही जिवलग! तेही आपली वाट पाहतात. असे नवे शब्द भेटले, की ते अक्षरशः आपल्याला घट्ट मिठी मारतात. अशाच वेगळ्या शब्द आणि नव्या वाक्प्रचारांची, नवीन जादू आज आपण पाहणार आहोत.

एका सुंदर पहाटे मी रेल्वेच्या फलाटावर माझ्या गाडीची वाट पाहत उभा होतो. तेवढ्यात सूर्योदय होऊन



कोवळे सूर्यकिरण हे माझ्या अवतीभवती उजळत आले. तिथेच एक अगदी तीन-चार वर्षांची छोटी मुलगी तिच्या आई बाबांबरोबर उभी होती. ते कोवळे ऊन तिने पाहिले नि ती तिच्या वडीलांना म्हणाली, ''बाबा, हे ऊन किती मऊमऊ आहे!''

मला गंमत वाटली. दुपारच्या उन्हाला आपण कडक ऊन म्हणतो परंतु पहाटेच्या कोवळ्या उन्हाला ऊन मऊमऊ आहे असे मी कधी ऐकले नव्हते. त्या धीटुकलीने नव्या ताज्या उन्हाला 'मऊ मऊ' असे निराळे विशेषण दिले. शब्दसुद्‌धा प्रवास करत असे रेल्वे स्थानकावर भेटतात, हे पटले की नाही.? असाच एक ओळखीचा वाक्प्रचार नव्या रूपात 'भेटला', हो हो.. मित्राप्रमाणे. तोही एका पुस्तकाच्या प्रदर्शनात! एकाच वेळी इतकी रंगीत, सुबक गोष्टी आणि कवितांची पुष्कळ पुस्तके पाहून, पुस्तके बघण्यात हरवून गेलेली एक लहान चुणचुणीत मुलगी तिच्या आई बाबांना म्हणाली,''किती छान पुस्तकं, कुठली वाचावी असा प्रश्नच पडलाय मला. माझ्या डोळ्यांना अक्षरशः पाणी सुटले आहे!''

जवळच पुस्तके चाळत मी उभा होतो. अचानक तो नवाच वाक्प्रचार ऐकून गंमत वाटली.मी थक्क झालो. भूक लागल्यानंतर, चविष्ट पदार्थ पाहून, तोंडाला पाणी सुटते हे आपण म्हणत असतो; परंतु वाचनाच्या भुकेमुळे पुस्तके पाहून, गोष्टीची पुस्तके पाहून डोळ्यांना पाणी सुटते, हे ती मुलगी चटकन बोलून गेली होती. अतिशय वेगळ्या प्रकारे सुचलेला हा तिचा वाक्प्रचार मला आजही आवडतो. शब्दही प्रवास करतात आणि वेगवेगळ्या पद्‌धतीने आपल्याला भेटतात, याची जाणीव मला वाचता वाचता झाली. अशीच एक गंमत!

शाळेत असताना गिर्यारोहणाची मला आवड. असेच एकदा एका उंच पर्वतावर दमछाक करीत, धापा टाकत पोहोचल्यावर एक नवाच वाक्प्रचार माझी जणू वाट पाहत उभा होता. आर्थिक प्रतिकूलतेमुळे शाळेत कधीही न जाऊ शकलेल्या, गुरे चारणाऱ्या कष्टकरी आजोबांनी माझी दमछाक पाहून म्हटलं, तुझी हौस लय गाजरं खाते! मला आश्चर्य नि आनंद झाला, कारण नसते उपद्‌व्याप ह्या अर्थाने एक नवाच वाक्प्रचार मला मिळाला. बघा, माझ्यासाठी तो डोंगरावर थांबला होता. असाच एक नवा शब्द एका अनोळखी आजीबाईंनी दिला. आपल्या देखण्या सुनेच्या रूपासाठी तिने शब्द वापरला, मोरांगी!

''मोर देखणा असतो. तशी ती मोरांगी!'' सांगा, आवडला की नाही शब्द? पहा, मी भटकंती करतो नि येताना नवे शब्द माझ्या पोतडीत भरून आणतो. आपल्या थोर संतकवींच्या काव्यात अनेक शब्द खूप वेगळ्या, हळुवार रूपात दिसतात. पाऊलचे पाऊ होते. आंबाचे अंबीया होते. कावळा काऊ होऊन मित्र होतो. 'उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ.'

आंब्याच्या डहाळीला 'आंबियाची डहाळी' असे एका अभंगात संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, तर संत तुकाराम महाराज, एका अभंगात वाटचे वाटुली करतात. 'पाहत असे वाटुली पंढरीची!' म्हणत ती वाट अधिक वळणाची करतात. आज आपण 'खेळ मांडला' असे म्हणतो, परंतु संत तुकाराम महाराजांनी. ''खेळ मांडीयेला'' असे म्हणून भावभक्तीचा तो खेळ अधिक सुंदर केला आहे. शब्दसुद्‌धा लोण्याहून मऊ होतात, आपली मराठी भाषा त्यांच्या प्रतिभासंपन्न बोटांनी कसे मनोहर रूप धारण करते, हे याच किशोर वयात तुम्ही बघण्यासारखे आहे. सुंदर शब्दांच्या भेटीसारखा दुसरा आनंद नाही आणि शब्द कधी उगीच रूप बदलत नसतात. म्हणूनच कविता वाचताना किंवा एखाद्या गोष्टी वाचन करताना लेखकाने त्यात शब्दरचना कशा प्रकारे केली आहे हे बारकाईने व रसिकतेने बघण्याची गरज असते. त्यातून आपल्याला या शब्दरूपी दागिन्यांची नक्षी कळत जाते. उगीच का म्हटले आहे, संत तुकाराम महाराजांनी,''शब्दांची रत्ने करूनी अलंकार, तेणे विश्वंभर पूजियेला!''

आपल्या अभिजात मराठी भाषेत हा रत्नमाणकांचा खजिना आहे. पण, त्यासाठी विविध ठिकाणी वाट पाहणाऱ्या स्थानकावर आपण पोहोचायला हवे.

ते स्थानक कधी पुस्तक असेल, कधी प्रवासातील एखादी व्यक्ती! कधी डोंगरवरचे ते आजोबा! कधी बोली भाषेचे सौंदर्य सहजतेने व्यक्त करणारी ती मोरांगी भाषेची आजीबाई!

**संपर्क :** ९८२०३८९४१४

डॉ. नीलिमा गुंडी

# शब्दांचा क्रम जुळवा बरं!

रविवार सकाळ होती ती! नेहमीप्रमाणे रेडिओवर गाणं लागलं होतं.

*'पूर्वेच्या देवा तुझे सूर्यदेव नाव.*
*पहाटेस येसी सारा जागवित गाव'*

ते गाणं ऐकताना किमयाला प्रश्न पडले. ती आईला म्हणाली, ''आई, कविता व गाणं यांमध्ये वाक्य नसतं. नाही का? पण त्यामुळे पटकन अर्थ कळत नाही गं!''

''अगं, जरा नीट कान देऊन ऐक. गद्य आणि पद्य यातला फरक कळेल म्हणजे तुला! पद्य म्हणजे कविता, गाणी, बरं का! त्यातल्या ओळींमधल्या शब्दांचा क्रम नीट जुळवला की त्याचे वाक्य तयार होते. मग त्याचा अर्थ कळतो. त्याला 'अन्वय लावणे' असं म्हणतात. म्हणजे दोन शब्द-जे खरं तर जवळ हवे आहेत. ते कवितेत कधी कधी चाल लावायला सोयीचे व्हावे म्हणून; तर कधी छंदाच्या नियमामुळे लांब गेलेले असतात. तुम्हांला मी शब्द तयार करण्यासाठी अक्षरे आणि अक्षरचिन्हे यांचा क्रम अचूक हवा; हे शिकवलं. तसंच वाक्य तयार व्हायला शब्दांचा क्रम अचूक हवा बरं! कळलं?'' आईचे बोलणे किमयाने अगदी कान देऊन ऐकले होते. तिने मान डोलावली नि म्हटलं ''हं, म्हणजे क्रियापद शेवटी हवं! थांब आई! आता मी या गाण्यातल्या ओळींचे वाक्यात रूपांतर करून बघते...''

''हे पूर्वेच्या देवा, तुझे नाव सूर्यदेव आहे. तू पहाटेच्या वेळी सगळ्या गावाला जाग आणत तू (आकाशात)



येतोस!'' किमयाने एका दमात शब्दांचा क्रम जुळवला सुद्‌धा! आई म्हणाली, ''छान! जमलं की तुला! आणि अन्वय लावताना कधी कधी एखाद्या शब्दाची भर टाकावी लागते. हेही तुला जमलं की!''

किमया आता अगदी खूष झाली. तेवढ्यात केदार आला नि म्हणाला, ''तिला जरा कठीण ओळी दे. हं! सांग गं!

***''गोड तुझ्या त्या स्वप्नामधली***
***दाखव मजला तुझी माऊली***
***दाखव तुझी माऊली!''***

''आई, तू हे गाणं म्हणतेस ना! ते मला फार आवडतं! किमया, आता सांग पाहू 'गोड' या शब्दानंतर कोणता शब्द हवा?''

किमयाला जरा विचार करायला लागला... गोड कोण? आई की खूप?' मग तिला 'स्वीट ड्रीम' हे शब्द आठवले. ती म्हणाली, ''हं, ऐक! (मुला) तुझ्या त्या गोड स्वप्नामध्ये येणारी तुझी माऊली (म्हणजे आई) मला दाखव!''

''आई, इथे मी 'मुला', हा शब्द मुद्दाम घातला.''

अगदी बरोबर! ''आई म्हणाली, ''काही वेळा अर्थ नीट जुळण्यासाठी काही विरामचिन्हांची भरही घालावी लागते हं! आता मी सांगते त्या ओळींचा अर्थ लिही पाहू!''

***'ससा रे ससा की कापूस जसा***
***त्याने कासवाशी पैज लाविली***
***वेगे वेगे धावू नि डोंगरावर जाऊ,***
***ही शर्यत रे अपुली!'***

केदार म्हणाला, ''मी करतो''.




''ससा अरे ससा, तो जसा काही कापूसच वाटतो. त्याने (एकदा) कासवाशी शर्यत लावली. (ती अशी-)

'आपण दोघे भरभर धावत डोंगरावर जाऊ! (बघू या आधी कोण जातो ते!)

आई म्हणाली, ''चांगला प्रयत्न आहे.''

दुसऱ्या दिवशी आईने घरातल्या फळ्यावर खालील ओळी गृहपाठासाठी दिल्या.

***''पाखरांची शाळा भरे पिंपळावरती***
***चिमण्यांची पोरे भारी गोंगाट करती,***
***जाते टळून दुपार उतरते ऊन,***
***पारावर जसा यांचा भरतो बाजार!''***

किमयाने या ओळींचा गद्यात दिलेला अर्थ असा होता. ''पिंपळावरती (झाडा) पक्ष्यांची (जणू) शाळा भरते. (त्यात) चिमण्यांची पिल्ले फारच गोंगाट (चिवचिव) करतात. ऊन कमी होते, दुपार टळून जाते. (झाडाच्या) पारावर जणू नुसता बाजार भरलेला असतो!''

किमयाने अन्वय लावताना काही शब्दांचे अर्थही दिले होते. आईने तिचे कौतुक केले. किमया आणि केदारला गाणं ऐकताना त्याचा गद्यात अर्थ लावण्याचा आता छंदच लागलाय

**संपर्क - ९८८१०९१९३५**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नंबर १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक - अनुराधा ओक**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Babar, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to G-10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Anuradha Oak**

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर

संपर्क : ९९२२५२२६६८

## जटिल

मुलीचे केस कंगव्याने किंवा फणीने नीट विंचरता येणार नाही इतके की जणू काही त्या केसांचा दोर वळला गेला आहे. साधूंचे किंवा ऋषीमुनींचे सुद्धा आपल्या केसांकडे असेच दुर्लक्ष असते म्हणून तर त्यांना 'जटा' म्हणतात. या जटेप्रमाणे एक एक घटक वेगळा करून पाहता न येण्यासारखे असेल किंवा असते. तेव्हा त्याला म्हणायचे जटिल. जटिल हे विशेषण समस्या या नामासाठी वापरण्याची प्रथा आहे. जटिल समस्या म्हणजे अत्यंत अवघड अशी समस्या.





## पडत्या फळाची आज्ञा

सीतामाईला रावणाने अशोकवनात ठेवले होते. जेव्हा हनुमान सीतेला शोधत शोधत अशोकवनात पोचला तेव्हा त्याला प्रवासाच्या थकव्यामुळे खूप भूक लागली होती. झाडावर खूप फळे होती पण ती संपूर्ण बाग रावणाच्या मालकीची होती ना! त्यामुळे हनुमानाने झाडावरची फळे मुळीच तोडू नयेत असे सीतेला वाटले. खाली पडलेली फळे खाण्याची आज्ञा किंवा परवानगी सीतेने हनुमानाला दिली. त्यावरून 'पडत्या फळाची आज्ञा' हा वाक्प्रचार रूढ झाला.

## राजा उदार झाला

'राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला.' एका गरीब स्त्रीचा सख्खा भाऊ राजा होता. घरात काही खायला नव्हते म्हणून मुलांना घेऊन बहीण राजाकडे गेली. पण तिथे तिला राणीने जेवू घातले नाही. भावाने वेलीवरचा भोपळा तोडून बहिणीला दिला. तेव्हा तिच्या विमनस्क अवस्थेतून निघालेला हा उद्गार आहे.





## ढालगज

युद्धामध्ये सगळ्यात समोर जो हत्ती असतो, त्याला शत्रूच्या शस्त्रामुळे काही इजा होऊ नये म्हणून त्याच्या कपाळावर ढाल बांधत असत. ज्या हत्तीच्या कपाळावर अशी ढाल बांधलेली आहे. अशा हत्तींना 'ढालगज' असे म्हणत. (गज म्हणजे हत्ती)

# प्रश्नमंजुषा

डॉ. सुधीर मोरे
संपर्क : ९४२२०००६११

१. ‘देशीकार लेणे’ म्हणून खालीलपैकी कोणत्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे?
अ) ज्ञानेश्वरी
आ) विवेकसिंधू
इ) करुणाष्टके
ई) अमृतानुभव

२. ‘मराठीतील आद्य कवयित्री’ म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?
अ) संत मुक्ताबाई
आ) संत जनाबाई
इ) संत महदंबा
ई) संत बहिणाबाई

३. ‘कीर्तनाचे प्रवर्तक’ कोणत्या संतास मानले जाते?
अ) संत तुकाराम
आ) संत एकनाथ
इ) संत नामदेव
ई) संत ज्ञानेश्वर

४. लीळाचरित्रात कोणाचे चरित्र रेखाटले आहे?
अ) श्री. चक्रधरस्वामी
आ) श्री. गोविंद प्रभू
इ) श्री. चांगदेव राऊळ
ई) श्री. नागदेवाचार्य

५. ‘निसर्गकवी’ म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?
अ) बालकवी आ) गोविंदाग्रज
इ) कुसुमाग्रज ई) माधवानुज

६. ‘केसरी’ वृत्तपत्राचे पहिले संपादक कोण?
अ) शि.म. परांजपे
आ) गोपाळ गणेश आगरकर
इ) लोकमान्य टिळक
ई) बाळशास्त्री जांभेकर

७. मराठी विश्वकोशाचे पहिले अध्यक्ष कोण?
अ) पं. महादेवशास्त्री जोशी
आ) कृष्णशास्त्री चिपळूणकर
इ) श्रीधर व्यंकटेश केतकर
ई) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

८. खालीलपैकी कोणत्या दिवाळी अंकाची शतकपूर्ती झाली आहे?
अ) शब्दालय आ) मौज
इ) ऋतुरंग ई) खेळ

९. लेखनदृष्ट्या योग्य शब्द ओळखा.
अ) आशिर्वाद आ) आशीर्वाद
इ) आर्शीवाद ई) आर्शिवाद

१०. ‘ग्रेस’ हे टोपणनाव कोणत्या कवीचे आहे?
अ) माणिक शंकर गोडघाटे
आ) नामदेव धोंडो महानोर
इ) कृष्णाजी केशव दामले
ई) गोविंद विनायक करंदीकर

**प्रश्नमंजुषा मार्च २०२६ ची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – इ | २ – अ | ३ – आ | ४– आ | ५ –इ |
| ६ –अ | ७ – इ | ८ – ई | ९ – अ | १० – ई |

मोगल जाधव

# महात्मा जोतीराव फुले

विद्यार्थी मित्रांनो, यंदा महात्मा फुले यांच्या जन्माला दोनशे वर्ष होत आहेत. म्हणजेच हे वर्ष आपण त्यांच्या जन्माचे ‘द्विशताब्दी वर्ष’ म्हणून साजरे करत आहोत. इतकी वर्षे होऊनही त्यांनी केलेले कार्य आजही समाजाला दिशादर्शक ठरले आहे. आपण या लेखातून महात्मा जोतीराव फुले यांनी केलेल्या कार्याची माहिती घेणार आहोत. महात्मा फुले यांच्याविषयी माहिती घेताना निश्चितच तुमच्या मनात त्यांच्याविषयीचा आदर द्विगुणित होईल.







जोतीरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्यांच्या आईचे नाव चिमणाबाई तर वडलांचे नाव गोविंदराव होते. जोतीरावांचे वडील व चुलते राणोजी आणि कृष्णा यांना लहानपणापासूनच काबाडकष्ट करावे लागले. ते पुण्यात एका सावकाराकडे शेळ्या राखण्याचे काम करत होते. पुढे त्या सावकाराने गोविंदराव, कृष्णा व राणोजी यांना आपल्या फुलांच्या व्यवसायात नोकरीला ठेवले. त्यांनी फुलांच्या व्यवसायात जम बसवला. या तीनही भावांच्या व्यवसायातील लौकिक पेशव्यांच्या कानावर गेला. पेशव्यांनी त्यांना आपल्याकडे फुले आणि फुलांच्या बनवलेल्या वस्तू पुरवण्याची आज्ञा केली. तसेच पेशव्यांनी त्यांच्याकडे आपल्या एका बगिच्याचे कामही सोपवले. तीनही भावांच्या प्रामाणिक सेवेबद्दल खूष होऊन पेशव्यांनी त्यांना पस्तीस एकर जमीन इनाम म्हणून दिली. ते फुलांच्या शेतीत नवनवीन प्रयोग करत होते. फुलांच्या व्यवसायामुळे लोक त्यांना 'फुले' म्हणून संबोधू लागले. तेव्हापासून त्यांनी आपल्या 'गोऱ्हे' या आडनावाऐवजी 'फुले' हे आडनाव धारण केले.

जोतीराव एक वर्षांचे असतानाच त्यांची आई, चिमणाबाईचे निधन झाले. त्यांच्या वडलांनी जोतीरावांना सातव्या वर्षी प्राथमिक शाळेत घातले. मात्र काही कारणांनी जोतीरावांच्या शिक्षणात खंड पडला. त्या वेळच्या रीतीरिवाजाप्रमाणे जोतीरावांचे लग्न लहान वयातच करण्याचे गोविंदरावांनी ठरवले. विवाहावेळी जोतीरावांचे वय तेरा वर्षांचे होते. जोतीरावांचा विवाह सावित्रीबाईंशी झाला. त्या वेळी सावित्रीबाई नऊ वर्षांच्या होत्या. हा विवाह सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. गोविंदरावांनी जोतीरावांना पुन्हा १८४१ मध्ये एका इंग्रजी शाळेत दाखल केले. जोतीराव अभ्यासू आणि हुशार होते. त्यांना परीक्षेत प्रथम श्रेणीचे गुण मिळत असत. जोतीरावांनी विद्यार्थीदशेतच 'छत्रपती शिवाजीमहाराज' यांचे चरित्र वाचून काढले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून वीरवृत्ती, स्वदेशप्रेम आणि उदात्त महत्त्वाकांक्षा हे गुण आत्मसात केले. त्यांनी 'राईट्स ऑफ मॅन' हा ग्रंथही वाचला. हा ग्रंथ प्रसिद्ध विख्यात विचारप्रवर्तक थॉमस पेन यांनी लिहिला होता. जोतीरावांना मर्दानी खेळाची आवड होती. ते तलवार चालवणे, दांडपट्टा फिरवणे हे खेळ खेळत असत. त्या वेळी सैनिकी शिक्षण देणारे आद्यगुरू लहुजी साळवे हे होते. त्यांच्या तालमीत जोतीरावांनी मर्दानी खेळाचे शिक्षण घेतले होते. जोतीराव जेव्हा दांडपट्टा फिरवत असत तेव्हा त्यांचे कौशल्य पाहण्यासाठी लोकांची गर्दी होत असे. १८४७ मध्ये त्यांनी आपला इंग्रजी शाळेतील अभ्यास पूर्ण केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सरकारी नोकरी केली नाही. त्यांच्या मनात लोकसेवा व लोककल्याण याविषयींचे विचार घोळत होते.

**शिक्षण विषयक कार्य –**

कोणत्याही समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे असते. शिक्षणाने माणसाला सारासार विचार करण्याची क्षमता प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव जागृत होते. म्हणूनच 'शिक्षण' हे सर्व सुधारणांचे मूळ आहे. यासाठी स्त्रिया आणि शूद्र यांना ज्ञानाचे दरवाजे खुले करायचे, असा निर्धार जोतीरावांनी केला. कारण दोनशे–अडीचशे वर्षांपूर्वी स्त्री आणि शूद्र यांना शिक्षण मिळणे दुरापास्त होते. जोतीरावांनी आपली पत्नी सावित्रीबाईंना घरीच शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांनी सावित्रीबाईंना घरीच लिहायला व वाचायला शिकवले. सावित्रीबाईंच्या शिक्षणाला जोतीरावांच्या घरच्यांनीही विरोध केला. पुढे सावित्रीबाईंनी अहिल्यानगर येथील प्रशिक्षण संस्थेमधून शिक्षक प्रशिक्षणाचा कोर्स पूर्ण केला. त्या प्रशिक्षित शिक्षिका झाल्या. मुख्याध्यापिकाही झाल्या. सावित्रीबाई या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका होत.

महात्मा फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. सुरुवातीला महात्मा फुले स्वतःच मुलींच्या शाळेवर शिक्षक म्हणून काम करत असत. सुरुवातीला शाळेत सहा मुली दाखल झाल्या होत्या. महात्मा फुले व सावित्रीबाईंच्या प्रयत्नांनी मुलींची संख्या अठ्ठेचाळीस पर्यंत वाढत गेली. १५ मे १८४८ रोजी पुण्यात दलित बांधवांच्या वस्तीत मुलामुलींची शाळा सुरू केली. या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्यासाठी वाचनालय असावे अशी इच्छा दर्शवली. वाचनालय स्थापन करण्यासाठी

महात्मा फुल्यांनी तनमनधन अर्पण करून विद्यार्थ्यांसाठी वाचनालय सुरू केले. महात्मा फुले हे विद्यार्थ्यांच्या मनात नवीन विचारांचे बीज रूजवत असत. विद्यार्थ्यांना विचार करायला शिकवत असत. समाजाला केवळ साक्षर करण्यासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई यांनी शाळा काढल्या नाहीत, तर शिक्षणाद्वारे समाजजागृती झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाद्वारे समाजात असणाऱ्या अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा त्यांना नाहीशा करायच्या होत्या. मुली शिक्षित होईल. त्यांच्यात प्रगल्भ विचार करण्याची क्षमता निर्माण होईल. असे त्यांना वाटत होते. महात्मा फुले यांनी १८४८ ते १८५२ या चार वर्षांत पुणे व पुण्याच्या परिसरात त्यांनी अठरा शाळा काढल्या. शाळा चालवण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. महात्मा फुले यांच्या मते, सरकारी शाळांमधून जे प्राथमिक शिक्षण देण्यात येते, ते पक्क्या आणि समाधानकारक पायावर उभारले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यात शिक्षण उपयुक्त आणि व्यवहारीपयोगी ठरले पाहिजे.

**सामाजिक कार्य**

स्त्री-शूद्रांच्या हक्कांसाठी आणि उद्धारासाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी केलेल्या कार्यास भारताच्या इतिहासात तोड नाही. मनुस्मृतीने स्त्री आणि शुद्रांचा 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्कच नाहीसा करून टाकला होता. त्यांची अवस्था अतिशय हलाखीची होती. महात्मा फुल्यांच्या बरोबरीने सावित्रीबाईंनीही समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. बालविवाह, सती प्रथा, केशवपन, विधवा पुनर्विवाहास विरोध, जरठ-कुमारी विवाह अशा अनिष्ठ प्रथा त्या काळी समाजात होत्या. या समाजघातक प्रथांना महात्मा फुल्यांनी विरोध केला.

एखाद्या महिलेच्या पतीचे निधन झाले तर त्या स्त्रीला नवऱ्याच्या चितेवर स्वतःला जाळून घेऊन सती जावे लागत असे. त्यात एखादी बालिका असली तरीही तिला सती जावेच लागे. महात्मा फुल्यांनी ही प्रथा घृणास्पद आणि चुकीची आहे म्हणून त्यांनी सती प्रथेला प्रखर विरोध केला. केशवपन ही एक अनिष्ठ रूढी होती. पतीचे निधन झाल्यानंतर त्या विधवा स्त्रीला मुंडण करावे लागे. या प्रथेला विरोध करण्यासाठी महात्मा फुल्यांनी नाभिकांचा संप घडवून आणला. त्यांनी आपल्या स्वतःच्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले होते. विधवा स्त्रियांना समाजात नगण्य स्थान होते. त्यांना कोणताच धार्मिक विधी करण्याचा अधिकार मिळत नव्हता. महात्मा फुल्यांनी या अन्यायाचा प्रतिकार केला. त्यांनी विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाला सक्रिय पाठिंबा दिला. त्या काळी अस्पृश्य मानलेल्या लोकांना काही सनातनी लोक हौदावर पाणी भरू देत नव्हते. त्यामुळे महात्मा फुल्यांनी आपल्या घरच्या आवारातील पाण्याचा हौद अस्पृश्यांकरता पाणी भरण्यासाठी खुला करून दिला होता. त्यांनी 'सत्यशोधक समाज' या संस्थेची स्थापना केली.

सामाजिक समता प्रस्तापित करण्यासाठी महात्मा फुले यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. स्त्रियांना आणि बहुजनांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाला होणारा विरोध कमी झाला आहे. केशवपनाची वाईट पद्धत नष्ट झाली आहे. सती प्रथा कायद्याने बंद झाली आहे. बालविवाहाविरुद्ध कायदे अस्तित्वात आले आहेत. महात्मा फुले यांनी शंभर-दिडशे वर्षांपूर्वी मांडलेले विचार आणि केलेल्या चळवळी याचा हा परिपाक आहे. महात्मा फुल्यांचे समाजसुधारणेचे कार्य आजही समाजाला दिशा देणारे आहे. मुंबई येथे भरलेल्या सभेत जनतेने त्यांना 'महात्मा' ही उपाधी बहाल केली.

महात्मा फुले आणि सावित्रीबाईंना स्वतःचे अपत्य नव्हते. मात्र त्यांनी १८७३ साली काशीबाई नावाच्या विधवेचा मुलगा दत्तक घेतला. त्याचे नाव 'यशवंत' ठेवले. पुढे हा यशवंत डॉक्टर झाला. महात्मा फुले यांचे निधन २८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'लोकशाहीचा अग्रदूत' या शब्दांत जोतीरावांचे सार्थ वर्णन केले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात,

*सत्याचा पालनवाला । हा धन्य जोतिबा झाला ।*
*पतितांचा पालन वाला । हा धन्य महात्मा झाला ।।*

**संपर्क – ९६७३०९५७९६**

विनायक ढवळे

हातात कापडाची जडशी पिशवी घेऊन विनायक शाळेच्या दरवाजात उभा होता. शाळेचा दरवाजा उघडायला अजून १० ते १५ मिनिटांचा अवधी होता. आज वार्षिक परीक्षेचा निकाल लागणार होता. हळूहळू विद्यार्थी जमू लागले. काहींच्या चेहऱ्यावर आनंद तर काहींच्या चेहऱ्यावर निकालाचे दडपण दिसत होते. तेवढ्यात विनायकला त्याचा मित्र गुणेश दिसला, तशी त्याची कळी खुलली.

''काय रे, पिशवीत काय एवढं जड आणले आहेस?'' गुणेशने त्यालां विचारले.

''अरे काही विशेष नाही., आपली या वर्षीची पुस्तके आहेत.'' विनायक उत्तरला.

''ती आज कशासाठी आणली आहेस?'' गुणेश

''अरे आपल्या मागच्या इयत्तेत तो सुदामा आहे ना, त्या बिचाऱ्याची परिस्थिती चांगली नाही. त्यातच त्याला वडील नाहीत. त्यामुळे माझी पुस्तके मी दरवर्षी त्याला देतो. तेवढाच त्याच्या आईचा खर्च वाचतो.'' विनायकने सांगितले.

''तू तुझ्या पुस्तकांचं काय करतोस?'' विनायक

''अरे जुनी झालेली पुस्तके रद्दीत देतो, दुसरं काय करणार.'' गुणेश म्हणाला.

# गुण आणि मार्क



''आज काय बेत आहे तुझा?'' विनायकने विचारले.

''आज संध्याकाळी भेळ पार्टी आहे. नंतर आई-वडलांबरोबर पुढच्या वर्षीच्या क्लासेसच्या चौकशीला जायचंय. आईवडील म्हणताहेत उन्हाळ्याच्या एक-दीड महिन्याच्या सुट्टीत पुढल्या वर्षाची तयार कर, म्हणजे चांगले मार्क मिळतील. मला कितीही मार्क मिळाले तरीपण आई-वडलांच्या दृष्टीने ते कमीच आहेत.'' गुणेशने आपला सुट्टीचा प्लॅन सांगितला.

''आणि तू काय करणार आहेस रे सुट्टीत?'' गुणेश.

''आज मला आई त्या अंध मुलींच्या शाळेत घेऊन जाणार आहे. माझ्या परीक्षेच्या निकालाचा आनंद आम्ही त्या मुलींना शालेय-साहित्य वाटून करणार आहोत. मग दोन-तीन दिवसांनी मामाच्या गावाला जाणार आहोत. त्या छोट्याशा गावात आम्ही खेड्यातल्या जीवनाचा अनुभव तर घेणार आहोतच पण त्याबरोबर जमलं तर थोडं-फार श्रमदान करून गावातील सार्वजनिक विहीर गावकऱ्यांच्या मदतीने अजून खोल करणार आहोत.'' विनायकने आपला सुट्टीतला कार्यक्रम सांगितला.

दोघांनाही अजून बऱ्याच गप्पा मारायच्या होत्या, कारण आता एक-दीड महिने ते एकमेकांना भेटणार नव्हते. पण तेवढ्यात शाळेचा शिपाई आला आणि त्या पाठोपाठ वर्गशिक्षक जोशी सरही आल्याने त्यांच्या गप्पांत खंड पडला. जोशी सरांनी फारसा वेळ न दवडता निकालपत्रके वाटायला सुरुवात केली. गुणेशला ९०% मार्क मिळाले होते. वर्गशिक्षकांनी त्याचे विशेष अभिनंदन केले. नंतर विनायकचा नंबर आला. त्याला ६१% मार्क मिळाले होते. दोघांनीही एकमेकांचे अभिनंदन करीत आपापली प्रगतिपुस्तके एकमेकांना दिली. विनायकने चित्रकला, संगीत, समाजशास्त्र, क्रीडा या विषयांत मार्कांची लयलूट केली होती. उलटपक्षी गुणेशला या विषयात फारसे चांगले मार्क मिळाले नव्हते.


गुणेश आणि विनायक दोघेही चांगले मित्र होते. गुणेशला शाळेत सर्व जण हुशार विद्यार्थी म्हणून ओळखत असत. दरवर्षी परीक्षेत भरघोस मार्क मिळवायचे हे त्याचे उद्दिष्ट असे. त्याला एक-दोन शिष्यवृत्या सुद्धा मिळाल्या होत्या. उलटपक्षी विनायक जात्याच हुशार होता. अभ्यासाबरोबर त्याला चित्रकला, संगीत, विविध क्रीडाप्रकार यात विशेष गोडी असायची. अशा विविध कलांची स्पर्धा जेव्हा असायची तेव्हा सर्वांना विनायकची आठवण व्हायची. गुणेशच्या आई-वडलांचा कटाक्ष मुलाच्या परीक्षेतील मार्कांवर असायचा. परंतु परीक्षेतील भरघोस मार्क म्हणजे किती गुण याचा विचार त्यांच्या मनात कधीच आला नाही. उलटपक्षी अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रमात सातत्याने भाग घेतल्याने विनायकला भरघोस मार्क मिळत नव्हते, पण त्याचे गुण विकसित होत होते. विनायक प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन विचार करीत असे ती समजून घेत असे उलटपक्षी गुणेश मार्कांवर नजर ठेवून परीक्षेपुरतेच पाहत असे त्यामुळे त्याची वाढ एका ठरावीक चाकोरीत होत होती, तर विनायकच्या प्रतिभेचे अनेक कंगोरे दिवसागणिक फुलत होते. त्याचे व्यक्तिमत्व दिवसेंदिवस खुलत होते, तर गुणेशची वाढ खुरटली गेली होती आणि परीक्षेतील मार्कांवरच थांबली होती. गुणेश परीक्षार्थी झाला होता तर विनायक विद्यार्थी.

गुणपत्रिकांचे वाटप संपले तसे जोशी सरांनी, गुणेश आणि विनायकला त्यांच्या जवळ बोलावले. त्यांना एकेक कॅडबरी आणि गुलाबाचे फूल देऊन त्यांचा सत्कार केला. त्याबरोबर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा सुरू झाली की गुणेशचा ९०% मार्क मिळाल्यामुळे सत्कार यथोचितच आहे पण विनायकला तर फक्त ६१% गुण मिळालेत त्याचा सत्कार का बरे केला असावा? त्याच्यापेक्षा जास्त मार्क मिळालेले विद्यार्थी आहेत की! काय बरे कारण असावे. त्यांना कुतूहल वाटू लागले. तेवढ्यात जोशी सरांनी बोलायला सुरुवात केली आणि आपापसांतल्या गप्पांना विराम मिळाला.

''विद्यार्थी मित्रांनो, उद्यापासून तुमची सुट्टी चालू होणार आहे. तुम्ही सर्वांनीही चांगला अभ्यास करून उत्तम मार्क मिळवले आहेत. तरीसुद्धा मी तुम्हांला सुट्टीतला गृहपाठ देणार आहे.''

''सुट्टीत आणि गृहपाठ? सर, नको ना, आम्हांला सुट्टीत भरपूर धमाल करायची सर.'' मुलांनी एकच गलका केला.

''घाबरू नका, हा नेहमीचा गृहपाठ नसणार आहे.




मी सर्वांना असे सांगेल की, या सुट्टीचा तुम्ही सर्वांनी सदुपयोग करा. सुट्टीत एखादी आवडीची कला शिका. मोबाईलवर गेम खेळण्यापेक्षा, भरपूर मैदानी खेळ खेळा. त्यामुळे तुमचे नेतृत्व गुण वाढीस लागतील. एखाद्या सामाजिक उपक्रमात भाग घ्या. त्यामुळे सामाजिक दायित्व दाखवण्याची संधी तुम्हांला मिळेल. आपल्यापेक्षा लहान गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन एखादी गोष्ट सांगण्याचा उपक्रम करा. पुढच्या वर्षीपासून आपण हा उपक्रम राबवणार आहोत. त्यामुळे तुमच्यामध्ये सभाधीटपणा येतो. अभ्यासात भरपूर मार्क मिळवण्याबरोबरच अंगभूत गुण वाढीस लागणे हेही फार महत्त्वाचे आहे. अभ्यासाबरोबर इतर कलाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. तुम्हांला आश्चर्य वाटले असेल की मी आज गुणेश बरोबरच विनायकचा सत्कार का केला?''

''सर, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. आम्हांला कुतूहल आहे.'' सर्वांनी एकाच स्वरात सांगितले.

''गुणेशला ९०% मार्क मिळालेत तर विनायकला ६१% मार्क मिळाले आहेत. पण विनायकला इतर कलागुणांत भरपूर मार्क मिळाले आहेत. अभ्यासाबरोबरच त्याने इतर क्षेत्रांतही आपली चमक दाखवली आहे. अभ्यासात मार्क मिळवणे जितके गरजेचे आहे त्याबरोबर अभ्यासाव्यतिरिक्त इतरही गोष्टीत प्रावीण्य मिळवणे तितकेच महत्त्वाचे आहे. तेव्हा मी सांगितलेले पूर्ण लक्षात ठेवून आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष द्या आणि एक सांगायचेच राहिले.''

''काय सर?''

''या वर्षी परीक्षा लवकर झाल्या आहेत, त्यामुळे एक आठवड्याची सुट्टी जास्त मिळणार आहे...''

जोशी सरांच्या या घोषणेने सर्वांना दुप्पट आनंद झाला. सर्वांनी जोरजोरात बाके वाजवून तो व्यक्त केला आणि त्याबरोबरच सुट्टीचा सदुपयोग करायचा निश्चय केला.

**संपर्क : ९३२२८११४५८**

# कुतूहल

योगेश दराडे, ९९२३७४०३७४

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' मार्च २०२६ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ एप्रिल २०२६ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

**१) सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?**
अ) लोकमान्य टिळक
ब) महात्मा जोतीराव फुले
क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
ड) लालबहादूर शास्त्री

**२) स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री सांगा?**
अ) पंडित जवाहरलाल नेहरू
ब) डॉ. राजेंद्र प्रसाद
क) जी. व्ही. मावळणकर
ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**३) महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री कोण आहेत?**
अ) पंकजा मुंडे ब) भारती पवार
क) रुपाली चाकणकर ड) सुनेत्रा पवार

**४) नुकतेच निधन झालेले 'मायकल नोब्स' कोणत्या खेळाशी संबंधित होते?**
अ) क्रिकेट ब) व्हॉलीबॉल
क) खो-खो ड) हॉकी

**५) 'ग्रॅमी पुरस्काराच्या बाल संगीत अल्बम' श्रेणीमध्ये कोणत्या बाल कलाकाराला पुरस्कार मिळाला आहे?**
अ) बिली आयलिश ब)ऑरा व्हॅलेंटिना (ऑरा व्ही)
क) लॉर्ड ड) लीन राईम्स

**६) 'राष्ट्रीय पंचायती राज' कोणत्या दिवशी साजरा केला जातो?**
अ) २४ फेब्रुवारी ब) २४ जानेवारी
क) २४ मे ड) २४ एप्रिल.

**७) नुकताच पद्मश्री पुरस्कार मिळालेले रघुवीर खेडकर हे कोणत्या नृत्य प्रकाराशी संबंधित आहेत?**
अ) सर्कस ब) नाटक
क) तमाशा ड) किर्तन

**८) 'जागतिक बौद्धिक संपदा दिवस' केव्हा साजरा केला जातो?**
अ) २६ मे ब) २७ एप्रिल
क) २६ एप्रिल ड) २९ फेब्रुवारी

**९) मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत या प्रसिद्ध पुस्तकांचे लेखक कोण?**
अ) महात्मा गांधी
ब) साने गुरुजी
क) लाला लजपतराय
ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**१०) 'नेक्सस (Nexus)' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक सांगा?**
अ) यान लॅकन ब) योशुआ बेंगिओ
क) डेमिस हसाबिस ड)युव्हाल नोआ हरारी

**११) 'ICC पुरुष T20 विश्वचषक २०२६' या क्रिकेट स्पर्धेचे यजमान देश कोणते होते?**
अ) भारत आणि चीन ब) भारत आणि रशिया
क) भारत आणि श्रीलंका ड) भारत आणि अमेरिका

**१२) 'पाचपट्टा किल्ला' महाराष्ट्रातील कोणत्या तालुक्यात आहे?**
अ) संगमनेर ब) अकोले
क) केज ड) पाथर्डी

१३) 'आंतरराष्ट्रीय विवेक दिवस' कोणत्या दिवशी साजरा केला जातो?

अ) ५ एप्रिल ब) ५ मार्च

क) १५ एप्रिल ड) २० एप्रिल

१४) 'राष्ट्रीय सागरी दिवस' कधी साजरा केला जातो?

अ) ११ मार्च ब) ५ एप्रिल

क) १८ एप्रिल ड) २० मार्च

१५) 'जागतिक आरोग्यदिन' कोणत्या दिवशी साजरा केला जातो?

अ) ११ जानेवारी ब)१२ एप्रिल

क) ७ फेब्रुवारी ड) ७ एप्रिल.

**चित्रकोडे**

रचना - घनश्याम देशमुख

**मार्च २०२६ उत्तर**




## चित्रकोडे फेब्रुवारी २०२६ यशस्वी स्पर्धक

- **ठाणे –** कु. अवंती जावळे, कु. श्रुती परांजपे
- **धाराशीव –** कु. श्रवण करवर,
- **सातारा –** कु. श्रीयांश सावंत, कु. सुवीर फडे, कु. धृव जगदाळे, कु. आर्यन जगदाळे, कु. श्रीयांश सावंत, कु. शौर्य सरगडे,
- **नाशिक –** कु. आरोही छाजेड, कु. यश वाघ, कु. अन्वी गायकवाड, कु. शिवाय परदेशी, कु. ज्ञानेश्वरी परदेशी, कु. श्वेता नाईक, कु. आरुष वाघ, कु. साई परदेशी, कु. आराध्या परदेशी, कु. अभय परदेशी
- **सिंधुदुर्ग –** कु. खूशी धुरी, कु. वृषाली गुरव, कु. विर्तिका शेर्लेकर, कु. वासंती धुरी, कु. आलिशा नाईक, कु. भक्ती नाचणेकर, कु. सानवी नाचणेकर, कु. वेदांत गुरव,
- **अकोला –** कु. जान्हवी अंभोरे, कु. साक्षी आग्रे, कु. प्रगती तेलगोटे, कु. तेजल पवार, कु. समृद्ध वाहुरवाघ,कु. दिव्या रेवस्कार, कु. वेदिका फुकट, कु. प्रणाली लव्हाळे, कु. स्वाती वाहुरवाघ,
- **पुणे –** कु. तनुष्का वामन, कु. जान्हवी खरमाळे, कु. ओवी ओक, कु. आदिती पाष्टे, कु. जिया तांबोळी, कु. रोहिताक्ष करंजावकर, कु. स्वानंद खंदारे, कु. अर्णवसिंग राजपूत.
- **कोल्हापूर –** कु. ऋत्वीक पाटील, कु. सलोनी चौगुले, कु. नेहा जाधव
- **परभणी –** कु. शर्वरी चांडक
- **रायगड –** कु. ओम जरग
- **सोलापूर –** कु. वेदांगी शिंदे
- **जालना –** कु. यश महेर
- **छत्रपती संभाजी नगर –** कु. कोमल चुंगडे,
- **परभणी –** कु. प्रचिती चांडक
- **मुंबई –** कु. अदिती जरळी

## फेब्रुवारी २०२६ कुतूहल यशस्वी स्पर्धक

- **कोल्हापूर –** कु. सिद्धार्थ कांबळे, कु. प्रथमेश आसवले,
- **ठाणे –** कु. अवंती जावळे,
- **परभणी –** कु. शर्वरी चांडक
- **सातारा –** कु. सुवीर फडे,
- **मुंबई –** कु. अदिती जरळी
- **सिंधुदुर्ग –** कु. विर्तिका शेर्लेकर, कु. दूर्वा जाधव,
- **कोल्हापूर –** कु. सलोनी चौगुले, कु. नेहा जाधव

## मार्च २०२६ कुतूहल उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ –ब | २ – ब | ३ – ड | ४–क | ५ –ब |
| ६ – ड | ७ – अ | ८ – क | ९ – ब | १० – अ |
| ११– ब | १२ – ड | १३ – ड | १४–ड | १५ –ब |

# भावी आधारस्तंभ

**माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.**

- **तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?**
- **जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?**
- **ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?**

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



मी अतिशय दुर्गम अशा डोंगराळ भागातील तामिणे या गावातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत शिकते. मला माझी शाळा खूप आवडते. प्रत्येक सोमवारी वर्गखोली उघडण्याची जबाबदारी माझी व वर्गमित्र सार्थकची असते. त्या दिवशी वर्ग उघडला असता आम्हांला वर्गात एक पारवा पक्षी बसलेला दिसला. दारे–खिडक्या उघडून आम्ही त्याला उडू देण्याचा प्रयत्न केला पण तो उडाला नाही. पाणी न मिळाल्यामुळे त्याला उडता येत नव्हते. आम्ही घाबरून न जाता त्याला जवळ घेतले व घरून गहू–बाजरीचे दाणे आणून त्याला खाऊ घातले. पाणी पाजले. पाटील सरांच्या मार्गदर्शनाखाली त्याला काही वेळ विश्रांती दिली. दुपारच्या सुट्टीमध्ये त्याला अलगद उचलून बाहेर नेले असता तो दोन–चार वेळा थोडे थोडे उडून खाली बसायचा. नंतर तो उडून आंब्याच्या झाडावर जाऊन बसला. मधली सुट्टी संपता संपता तो उडून दूरवरच्या झाडावर जाऊन बसला. मुख्याध्यापक सरांनी आमचे कौतुक करून शाबासकी दिली. आम्हांला खूप आनंद झाला.

**कुमारी किरण चंद्रकांत जाधव**
**कुमार सार्थक बापू साळुंखे**
जि. प. शाळा, तामिणे, ता. पाटण, जि. सातारा ४१५११२.



मी एके दिवशी शाळेतून घरी येत होते तेव्हा मला एक मांजरीचे पिल्लू दिसले. त्या पिल्लाला थोडीशी जखम झाल्यामुळे चालता येत नव्हते. मी त्या पिल्लाजवळ गेले व बघितले की मांजरीच्या पिल्लाला किती जखम झाली आहे. मांजरीच्या पिल्लाला फारच जखम झाली होती. त्या पिल्लाची ही परिस्थिती पाहून मला खूप वाईट वाटले.

मी त्या पिल्लाला उचलले व एका छोट्या पिंपळाच्या झाडाच्या पानावर नेऊन ठेवले. जखमेमुळे चालता येत नसल्यामुळे त्या पिल्लाला अन्न मिळत नव्हते. मग मी त्या पिल्लाला चपाती, पुरी, भाकर असे खाऊ घातले व त्या पिल्लाला झालेली जखम हळूहळू कमी–कमी होत गेली. मग त्या पिल्लाची जखम नीट झाल्यामुळे ते पिल्लू चालू लागले. ते मांजरीचे पिल्लू चालू लागल्यामुळे मला खूप आनंद झाला.

**कु. वैष्णवी अमृत घुले**
जि. प. प्राथमिक शाळा, केळसांगवी, ता. आष्टी, जि. बीड – ४१४२०८.



मी आणि माझे बाबा बाजारात गेलो होतो. आम्ही जात असताना एक मुलगी रस्त्यावरून जात होती. तिचे कपडे मळलेले होती व फाटलेले होते. मग चालता चालता ती पडली व तिच्या पायाला जखम झाली. आम्ही तिला मलमपट्टी केली व तिच्या आई वडलांनी तिला घरी नेले. आम्ही फळे व भाज्या घेऊन घरी आलो व घडलेली सगळी गोष्ट आजीला व आजोबांना सांगितली व माझ्या आजीआजोबांनी मला शाबासकी दिली.

**कु. श्रुती जयदेव सगर**
जि. प. प्राथमिक शाळा गोरेवाडी,
पो. बुकनवाडी,
ता. जि. धाराशीव – ४१३५०९.



मी आणि माझी मोठी बहीण आम्ही जुन्नर एस्.टीची वाट पाहत होतो. आमच्या समोर एक आजोबा उभे होते. अचानक त्यांना चक्कर आली. ते जमिनीवर कोसळले. मी आणि माझी मोठी बहीण आम्ही त्यांच्याजवळ गेलो. माझ्या बहिणीने लगेच पिशवीतून पाण्याची बाटली काढली व आजोबांच्या तोंडावर पाणी शिंपडले. आजोबांनी डोळे उघडले. आम्ही त्यांना एका कठड्यावर बसवले. त्यांना प्यायला पाणी दिले व एक बिस्कीटचा पुडा दिला. आजोबांनी पुडा संपवला आणि त्याचा चेहरा खुलला. त्यांनी आमचे आभार मानले. मी हे सगळं घरी सांगितले. आई–बाबांनी आम्हांला शाबासकी दिली.

**कु. ज्ञानेश्वरी पोपट शेळके**
न्यु इंग्लिश स्कूल करंजाळे, मु. करंजाळे,
पो. खुबी, ता. जुन्नर, जि. पुणे ४१२४०९



एकदा मी माझ्या घरासमोरील अंगणात कैऱ्या खात बसलो होतो. तेवढ्यात रस्त्यातून जाताना तीन–चार गुरे दिसली त्यात एक लहान वासरू होते. आमच्या घरासमोर एक हातपंप आहे. गावातील सर्व लोकं तिथे पाणी भरायला येतात. दुपारची वेळ असल्यामुळे तिथे कोणीच नव्हते. आजूबाजूला साठलेले पाणी नव्हते. ते छोटे वासरू हातपंपाभोवती पाणी शोधत होते. मला खात्री झाली की ते तहानलेले असावे. मी अंगणातील एक प्लॅस्टिकचे घमेले उचलले नि हातपंपाजवळ गेलो. मी घमेल्यात पाणी भरले व ते वासरापुढे ठेवले. वासरू पोटभर पाणी प्यायले. मग ते आपल्या आईच्या मागे पळत गेले. त्या दुडूदुडू धावणाऱ्या वासराकडे मी कितीतरी वेळ बघत होतो. आई म्हणाली, ''बरं झालं तू त्याला घमेल्यात पाणी दिलंस. दुसऱ्याचा जीव जाणला पाहिजे.'' मला खूप आनंद झाला.

**कु. प्रसाद गुरुनाथ वाघ**
इ.७ वी, जि.प. शाळा सिंगापूर नं.१, ता. मुरबाड जि. ठाणे ४२१४०२.

उमलती प्रतिभा

# अभ्यास

आज आहे सुट्टी
उद्या लिहू अभ्यासाची चिठ्ठी
कधी संपली सुट्टी
आणि शिक्षकांच्या काठीने
मारली मिठी
कळलंच नाही..

हात सूजले, मन फुगले
मला करायचा अभ्यास
पण माझी आहे
मोबाईलकडे आस...

मोबाईल, टि.व्ही. म्हणता म्हणता
कधी दूर गेली ही
पुस्तकांची ज्ञानशाही
अभ्यास अभ्यास म्हणता
कधी आली परीक्षा सहामाही
कळलंच नाही...

आई म्हणते कर अभ्यास
बाबा म्हणतात धर अभ्यासाचा ध्यास
मन होत नाही एकाग्र
आता मी होत आहे चिंताग्रस्त

आज करतो अभ्यास...
उद्या करतो अभ्यास...
असे म्हणता म्हणता
वर्ष कधी संपले.
कळलंच नाही.

मार्कलिस्ट हातात आल्यावर
डोळ्यांतील अश्रू काही
थांबले नाहीत...

फक्त ही माझी नाही
तुमची सुद्धा आहे कहाणी
हे वर्ष गेलं पण येणाऱ्या
वर्षी पिऊ आपण या
ज्ञानाची अमृतवाणी...

टि.व्ही.मोबाईलचा
नाद सोडा...
आता तरी अभ्यासाचा
ध्यास मनाला जोडा...

गेलेल्या वर्षाचा विचार
नाही करायचा
आजपासून आपण
अभ्यास करायचा...

**कु. प्रियांका सर्जेराव पाटील**
कडगांव हायस्कूल, कडगाव, व
श्री समर्थ कनिष्ठ महाविद्यालय कडगाव,
मु. एरंडपे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर ४१६२०९.



# वेटिंग फॉर द विसा

या सुट्टीत मी वाचलेले व मला आवडलेले पुस्तक बाबासाहेब आंबेडकरांचे 'वेटिंग फॉर द विसा'. मी 'वेटिंग फॉर द विसा' नावाचे संपूर्ण पुस्तक वाचले. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील अडथळे पाहून मला खूप वाईट वाटले.

अस्पृश्य असल्याकारणाने लोकांकडून त्यांच्यासोबत खूप गैरवर्तन होत होते. त्यांच्या जीवनामधील पहिला अस्पृश्यतेचा प्रसंग तेव्हा घडला जेव्हा ते नऊ वर्षांचे होते. आंबेडकरांना त्यांच्या वडलांना कोरेगावला भेटायला जायचे होते. म्हणून ते रेल्वेने निघाले. हा प्रवास त्यांच्या जीवनातील पहिला रेल्वेचा प्रवास होता. आंबेडकर आपल्या भावंडांसोबत निघाले होते. आंबेडकर जवळच्या स्टेशनवर पोहोचले. कोरेगाव तेथून दहा ते बारा कि. मी अंतरावर होते. त्यांनी गाडी करण्यासाठी खूप प्रयत्न केला पण कोणीही त्यांना नेण्यासाठी तयार नव्हते कारण ते अस्पृश्य होते. शेवटी दोन – तीन तासांनंतर त्यांना गाडी मिळाली. पण ती एका अटीवर दिली होती की, आंबेडकर किंवा त्यांची भावंडे ते स्वतः चालवतील. मग त्यांनी हे मंजूर केले. गाडीवान त्यांच्या सोबत चालत होता. आंबेडकरांना व त्यांच्या भावंडांना खूप भूक लागली होती. त्यांच्यापाशी घरून आणलेला डबा होता पण अडचण अशी की, त्यांच्याकडे प्यायला पाणी नव्हते. रात्र झाली होती. ते एका झोपडीत मुक्कामासाठी राहिले. त्यांचा डबा संपलेला होता.

ते सर्व जण तीन दिवस उपाशी होते आणि शेवटी मग ते त्यांच्या वडलांकडे पोहोचले. एकच नाही तर, असे हजारो प्रसंग त्यांच्या जीवनात घडले आहेत. डॉ.आंबेडकर सांगतात की त्यांचा जीवनातला एक अविस्मरणीय क्षण म्हणजे बडोद्याचा प्रसंग. आंबेडकर विलक्षण बुद्धिमत्तेचे होते. बडोद्याच्या महाराजांनी त्यांना शिक्षणासाठी विदेशात पाठवले. शिक्षण पूर्ण झाल्यावर डॉ. आंबेडकर बडोद्याला परतले. तिथे त्यांच्या ऑफिसमध्ये त्यांनी काम केले. तिथे त्यांना राहण्यासाठी जागा नव्हती. मग एका हॉटेलवाल्याने ''पारशी धर्मशाळेत तुम्हांला मुक्कामासाठी जागा मिळेल'' असे सांगितले. मग ते तिथे गेले तेव्हा त्यांना रजिस्टरमध्ये पारशी नाव नोंदवायला सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते ऑफिससाठी निघाले तेवढ्यात त्यांनी त्यांच्या दरवाजासमोर पारशी लोक पाहिले. त्या लोकांना माहीत झालं असेल की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पारशी नाहीत. त्या लोकांनी आंबेडकरांना तिथेच धमकवायला सुरुवात केली आणि आंबेडकरांना ती धर्मशाळा सोडावी लागली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य हे खूप संघर्षमय होतं. पण डॉ. बाबासाहेबांनी हार मानली नाही. त्यांनी ज्ञानाची ताकद मिळवून भारतासाठी एक संविधान तयार केले आणि भेदभावांसारख्या अनेक गोष्टींवर मात केली. आपल्या जीवनात अडथळे आले तर त्याच्यावर मात करण्याची क्षमता आपल्या हातात असली पाहिजे. आपणही त्यांच्यासारखे परिश्रम घेतले पाहिजे आणि आपल्या आयुष्यात सतत प्रगतीकडेच वाटचाल केली पाहिजे.

**तेजस मेकाले, (इयत्ता आठवी)** इन्फिनिटी पोदार लर्न स्कूल, मालखेडा ता. भोकरदन जि. जालना.



**कु. प्रगती आबाजी गोसावी,** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिरापूर (दरसवाडी), ता. चांदवड, जि. नाशिक



**श्रेया सुहास पवार,** इयत्ता–सहावी
जि.प.प्राथमिक शाळा वनवासमाची नवी, ता. कराड
जि. सातारा, पिन कोड– ४१५१२४



जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
जादूगार विक्रम यांनी पोलिसांना सर्व काही सांगितले.
आज सकाळी दोन इसम माझ्या बंगल्यावर आले, त्याच्या हातात बंदुकी होत्या. त्यांनी काळे चष्मे घातले होते. मलाही काळा चष्मा घालायला सांगितला.
त्यांना माहीत होते की, मी डोळ्यांत बघून संमोहित करू शकतो म्हणून ते काळे चष्मे घालून आले असावेत.
तुम्हांला एक छोटी जादू करायची आहे साहेब. आमचा शस्त्राने भरलेला ट्रक या शहराबाहेरच्या टोलनाक्यावरून पोलिसांच्या नजरेतून बाहेर काढायचा आहे.
त्यासाठी त्यांनी माझ्या बायको–मुलाला ओलीस ठेवले. तितक्यात ही मुले आली.
आम्हांला जादूगार सरांना भेटायचे आहे.
हो, आम्हांला तो इसम जरा विचित्रच वाटला, मी शोध घ्यायचा ठरवले आणि याच्या गाडीत लपून इथे आलो. तेव्हा कळलं की, हा गुंड काहीतरी करणार आहे.


मी जवळ आलो आणि संमोहित केलं आणि ट्रक नजरेसमोरून गेला.. या दाराने आनंदाच्या भरात गॉगल काढला आणि ....
आता नीट कळलंय मला, या गुंडाला अटक करा, त्या ट्रकची माहिती काढा आणि एक तुकडी जादूगाराच्या घरी पाठवा.
पोलिसांनी तत्परता दाखवली. जादूगाराच्या घरून दुसऱ्याला अटक केली. विनय, राजेश नेहा त्यांच्या घरी पोहोचले.
नंतर
तुम्ही आता येणार ना आमच्या वार्षिक महोत्सवाला?
का नाही, तुझ्यामुळे त्या बदमाशाच्या तावडीतून माझी सुटका झाली. धन्यवाद.
तिघे आनंदाने आपल्या घरी परतले.
समाप्त

# बाळ

■ मधुमती वऱ्हाडपांडे

बाळा वाटे येता जाता
बागेमध्ये बागडावे
बोट धरून ताईचे
फिरायला दूर जावे

स्वयंपाकात आईच्या
लुडबुड जरा करावी
कैरी चिरून देताना
एक फोड पळवावी

कांड्या घेऊन रंगीत
चित्र एक रंगवावे
चांदोबाला उगाचच
लाल चुटूक करावे

आजोबांच्या मांडीवर
लाडेलाडे बागडावे
ओढताना मिशा त्यांच्या
जोरजोरात हसावे


त्रास दिल्यास दादाने
त्याचे बांधावे उन्हामध्ये घर
अन् आईला सांगावे
त्याच्यासवे कट्टी कर

बाबा घरी आल्यावर
कडेवर झेपावावे
चॉकलेट मिळताच
आनंदून खिदळावे

रात्र मग झाल्यावर
गोष्ट मोठ्ठी एक हवी
पटापट आटोपून
आजी सांगे रोज नवी

गोष्ट ऐकता ऐकता
मांडीवर झोपी जावे
गोड गोड स्वप्नामध्ये
हलकेच दंग व्हावे

संपर्क : ९८९०६७९५४०



# The Power Of Reading

■ Sachin Chavan

*Books are doors to worlds unseen,*
*Where heroes rise and hearts grow keen.*
*Each page a spark, a glowing light,*
*That turns the dark to pure delight.*

*A single line can make you dream,*
*Of magic lands and flowing streams.*
*Through every word, your mind takes flight,*
*Beyond the day, into the night.*

*Reading builds a wiser soul,*
*It shapes your thoughts, it makes you whole.*
*It gives you wings, it makes you strong,*
*And guides your heart to right from wrong.*

*So open books, let stories lead,*
*For knowledge grows with every read.*
*The power lies in every page—*
*A timeless gift from age to age.*

***Contact: 9158393260***



Vidya Dengle

# Bunty's Museum of Teddy Bears

Little Bunty was a very sweet boy. Everyone in the neighbourhood liked him. Why? Because he always smiled and greeted everyone he met.

Today was his fifth birthday. He had invited all his friends home for a party. Colourful balloons filled the house. His sister Gudiya hung them in the living room with the help of their dad. This year's theme was Teddy Bear. Teddy Bears were everywhere—big and small, colourful inflatable ones floating around the room. At the entrance stood a huge Teddy Bear made of fibre glass, created by Bunty's sculptor dad himself.

When Bunty came home from school, he could not believe his eyes. He jumped with joy and began singing the Teddy Bear song he had learnt in school:

Teddy Bear, Teddy Bear, why is your nose black? Teddy Bear, Teddy Bear, why are you so fat?

Teddy Bear, Teddy Bear, you are fat and yet so cute, Teddy Bear, Teddy Bear, why are you black and brown?

He jumped, ran, and rolled on the carpet in excitement. His favourite Teddy Bears were everywhere!

"Amma, did you bake a Teddy Bear cake for me?" he asked eagerly.

"No, Beta," said Amma smiling. "I'm not an expert at baking animals. I have made something else—a surprise!"

And she went back to the kitchen.

Bunty finished his meal in a hurry. He was so excited that while running around the house, he fell on a big Teddy Bear. Suddenly, all the air rushed out and the fat bear became flat! Bunty burst into tears.

"I told you not to run everywhere," said Amma





gently. “You could have got hurt. Now stop crying.” Tired and sleepy, Bunty hugged the flat Teddy Bear and soon fell asleep.

In his dream, the Teddy Bear grew as big as an elephant. The bear wanted Bunty to sit on his back, but Bunty was too small to climb. When the bear tried to sit down to help him, Bunty screamed in fear,

“No! If you sit, you’ll fart and become flat!”

Bunty’s loud scream woke everyone up. His Dada-Dadi and Nana-Nani rushed in and found him singing in his sleep,

“Teddy Bear, Teddy Bear, why do you have to fart?”

Everyone burst out laughing.

In the evening, guests began arriving with Teddy Bears of different sizes, colours, and materials. Soon, the house was flooded with Teddy Bears.

But where was Bunty?

“Come on, bachhe log, find out where Bunty is!” announced his dad.

There was chaos everywhere. Bunty—the birthday star—was missing! Suddenly, a gong sounded. Down the stairs came a huge Teddy Bear, holding cymbals and singing,

“Teddy Bear, Teddy Bear, why do you have to fart…”

The Teddy Bear walked straight to the cake table. The surprise cake—of course—was shaped like a Teddy Bear! Everyone clapped and sang Happy Birthday as Bunty removed his costume.

Bunty went crazy with joy and ran around with his friends until the party finally came to an end.

The next morning, Bunty woke up to see a board in his room that read:

“Welcome to Bunty’s Museum of Teddy Bears.”

All his Teddy Bear gifts were neatly arranged around the room.

“Dad, Amma, you made me so special,” Bunty said happily.

“Yes, Beta,” said Amma, hugging him. “You were special yesterday. To remain special forever, always stay joyful and work hard.”

Bunty jumped excitedly and said,

“But Amma, next year I want my birthday party in Lodhi Garden!”

“Agreed!” all the elders said together.


And with that promise, Bunty’s wonderful birthday celebration truly came to a happy end.


**Contact : 9822091430**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Spot the different shapes hidden in the carpet. Count and fill in the number.**





**Fill in the missing numbers to complete the magic square.**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | + | | = | 12 |
| x | | x | | |
| | ÷ | 2 | = | 6 |
| = | | = | | = |
| 36 | ÷ | | = | 2 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | + | | = | 15 |
| + | | + | | - |
| 15 | - | 5 | = | |
| = | | = | | = |
| 20 | - | | = | 5 |

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख


हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




**सूचना**

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.
२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल २०२६.
३) कोड्याचे उत्तर मे २०२६ च्या अंकात प्रसिद्ध होईल. ४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.03.2026, Date of Posting- 27th & 28th March 2026 posted at PUNE PSO, GPO- 411 001
(License to Post without prepayment of postage No. WPP-53/ 2024-2026)




ऑनलाईन वर्गणीकरिता सोबतचा क्यूआर कोड स्कॅन करा. व अधिक माहितीसाठी ९४२३००५०८९ या क्रमांकावर संपर्क करा.

प्रति,

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in